# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक दुसरा


## मराठी राजभाषा दिन



**ज्ञानोबाची तुकयाची
मुक्तेशाची जनाईची
माझी मराठी चोखडी
रामदास-शिवाजीची ।।**

-वि. म. कुलकर्णी











## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६ मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦फेब्रुवारी २०२६ ♦वर्ष सव्विसावे ♦अंक दुसरा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाउस


## – अनुक्रमणिका –



| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| श्रद्धांजली | ८ |
| अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय भाषण | १२ |
| पुस्तकाच्या पानांतून अस्मानभरारी | ३६ |
| दिनविशेष | ६२ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



## संपादकीय

# ललित-वैज्ञानिक साहित्यपरंपरेचा ‘रेशीमगोफ’

‘फेब्रुवारी’ हा मराठी भाषेची समृद्ध परंपरा आणि प्रगत वैज्ञानिक दृष्टिकोन हे महत्त्वाचे दोन स्तंभ जोडणारा महिना; कारण २७ फेब्रुवारीला ‘मराठी राजभाषा दिन’, तर २८ फेब्रुवारीला ‘विज्ञान दिन’ हे साजरे केले जातात. हे दोन्ही दिवस म्हणजे, प्रत्येक मराठी मनाचा जणू श्वासच... नाही का!

ज्ञानपीठ पुरस्कारविजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ, ‘मराठी राजभाषा दिना’च्या माध्यमातून मराठी भाषेचं शाश्वतपण टिकवण्याचा प्रयत्न होतो. तो



वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न सर्वतोपरीने होताना दिसतो. या अनुषंगाने, मेहता पब्लिशिंग हाऊसचं अतिशय भरीव योगदान त्यात आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेली विविध आशय-विषयांधारित ललित-ललितेतर-अनुवादित अशी सर्व प्रकारची पुस्तकं वाचकांना शब्दातीत अनुभव देतात. 'मराठीचे व्याकरण', 'शब्दचर्चा', 'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' यांसारखी पुस्तकं केवळ भाषाशास्त्राच्या दृष्टीने प्रगल्भ वाचनानुभव देतात; ज्ञानसंपन्न करतात. मराठी भाषेची समृद्ध परंपरा जतन करण्याचाच हा एक भाग आहे.

किंबहुना, साताऱ्यात नुकत्याच झालेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून याचीच प्रचिती साहित्यप्रेमींना आली. विविध साहित्यिक कार्यक्रम-उपक्रमांची त्यात रेलचेल होती. तसंच, ज्येष्ठ साहित्यिकांचा सत्काररूपी आशीर्वाद या संमेलनास लाभला. या वेळी, 'मराठीच्या हितासाठी सर्वांनी जातिभेद, पक्षभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याचं व पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेतच शिकवावं,' असं आवाहन करण्यासोबतच, साहित्य संमेलन ही राज्याच्या संस्कृतीला आकार देणारी घटना असल्याचं संमेलनाध्यक्ष माननीय विश्वास पाटील यांनी स्पष्ट केलं. तर, 'मराठी भाषेच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणं आवश्यक आहे; कारण त्यातूनच भविष्यात लेखक-अभ्यासक निर्माण होतील,' असं मत मावळत्या संमेलनाध्यक्षा डॉ.तारा भवाळकर यांनी नोंदवलं. त्याचप्रमाणे, 'महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सक्ती आहे; इतर कुठल्याही भाषेची नाही' असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. एकूणच, साहित्यिक उपक्रम-लेखन यांद्वारे सामाजिक जाणीव विस्तारित होण्याच्या दृष्टीने या संमेलनाचं अभूतपूर्व योगदान होतं.

अशाच प्रकारे ही सामाजिक जाणीव दृढ होण्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी साहित्यनिर्मितीच्या अनुषंगाने मराठी साहित्यक्षेत्रातला 'वैज्ञानिक साहित्यप्रवाह' फार महत्त्वाचा ठरतो. डॉ.ए.पी.जे.अब्दुल

कलाम, डॉ.जयंत नारळीकर, डॉ.अनिल काकोडकर यांच्यासारख्या शास्त्रज्ञ-लेखकांचं विज्ञानविषयक लेखन विशेष उल्लेखनीय आहे. विज्ञानाचं महत्त्व व स्थान हे केवळ विज्ञान दिनापुरतंच सीमित नाही; तर आपल्या रोजच्या जगण्यातच विज्ञान अंतर्भूत आहे. या पार्श्वभूमीवर; विज्ञानातील क्लिष्ट संकल्पना, तत्त्वं, वैज्ञानिक शोध हे साहित्यातून मनोरंजक पद्धतीने मांडले जातात. त्यांत विज्ञानकथा, कादंबऱ्या, माहितीपर लेख, साधे-सोपे प्रयोग यांचा समावेश होतो. त्यांद्वारे विज्ञान हे सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचतं. विद्यार्थिवर्गालाही या विषयाची गोडी लागते. याही अनुषंगाने, मेहता पब्लिशिंग हाऊसचं दालन अनेक लेखकांच्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकांनी संपन्न आहे. डॉ.बाळ फोंडके, निरंजन घाटे, डॉ.संजय ढोले, डी.एस.इटोकर, डॉ.सुरेशचंद्र नाडकर्णी, लीना दामले, सुधा रिसबूड, शुभदा गोगटे अशा साहित्यिकांनी आपल्या लेखनातून विज्ञान अतिशय सोप्या भाषेत उलगडलं आहे. त्या दृष्टीने- 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमतीजमती', 'अंतरिक्षाचा वेध', 'सुगरणींचे विज्ञान', 'अज्ञाताचे विज्ञान', 'खेळणीच खेळणी', 'साधी यंत्रे', 'प्लँटोन', 'अंतराळातील मृत्यू', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'वाचनातून विज्ञान', 'वसुदेवे नेला कृष्ण', 'अस्मानी'- अशी पुस्तकं अतिशय वाचनीय आहेत. विशिष्ट वैज्ञानिक वाचनानुभव देणारी आहेत. विशिष्ट गोष्टींमध्ये-घटकांमध्ये अनुस्यूत असलेल्या वैज्ञानिक संकल्पना त्या-त्या लेखनातून लेखकांनी अतिशय प्रभावीपणे स्पष्ट केल्या आहेत. त्यांमध्ये कुठल्याही प्रकारे कठीणता अथवा क्लिष्टता नाही. उलट, अत्यंत रंजक पद्धतीने विषय-मांडणी केली असल्याने पुस्तकांचा आशय खूप छान उलगडतो. आकलनाच्या पातळीवर त्यात सुलभता आहे. तंत्रज्ञानविषयक तत्त्वं, शास्त्रीय तत्त्वं यांची उकल अतिशय सोप्या पद्धतीने होते. आपल्या रोजच्या जगण्यातल्या विज्ञानाचा साहित्याशी असलेला अनुबंध व्यक्त करणारं हे सर्व लेखन आहे. प्रसंगी,

भविष्यकालीन समाजावरचा विज्ञानाचा परिणाम हाही व्यक्त होतो. शोधाचा बोध घडवणारं हे लेखन आहे. त्यातील अचूकता, स्पष्टता, वस्तुनिष्ठता व सुलभ भाषा यांमुळे वाचकांच्या ठायी वैज्ञानिक जाणीव दृढ होते. यातूनच सकारात्मक सामाजिक जाणीव विकसित करण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक साहित्यप्रवाह देतो.

अशा रीतीने, ‘मराठी राजभाषा दिन’ आणि ‘विज्ञान दिन’ साजरे करण्यात येणारा हा महिना वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. मराठी ललित वाङ्मय आणि वैज्ञानिक विचारधारा यांचा जणू या निमित्ताने रेशीमगोफ विणला जातो; जो सर्वांना खऱ्या अर्थाने समृद्धतेकडे घेऊन जातो.

अखिल मेहता

# श्रद्धांजली


## शुभदा गोगटे कालवश



**पुणे :** मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ज्येष्ठ लेखिका शुभदा गोगटे यांचं नुकतंच वृद्धापकाळाने निधन झालं. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेली त्यांची 'सांधा बदलताना' ही कादंबरी लोकप्रिय झाली. त्याचबरोबर, 'निरामय यशासाठी ध्यान' हे व्यक्तिमत्त्व विकसन करणारं पुस्तक, 'हृदयविकार निवारण' हे आरोग्यविषयक पुस्तक, 'वसुदेवे नेला कृष्ण' आणि 'अस्मानी' हे विज्ञानकथासंग्रह, तसंच 'घर' हा गूढकथा-संग्रह ही सर्व वाचकांच्या पसंतीस उतरली आहेत.

शुभदा गोगटे यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!



## उपमुख्यमंत्री अजित पवार कालवश



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तत्कालीन नेते आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं नुकतंच विमान दुर्घटनेत निधन झालं. एक कर्तबगार नेता- कार्याध्यक्ष कार्यकर्ता - जनमानसात मिसळून काम करणारा असा कार्यतत्पर व्यक्तिमत्त्व असलेला हरहुन्नरी नेता हरपला. महाराष्ट्राच्या राजकारणात जो अजित; म्हणजेच पूर्णपणे पराजित न होता सातत्याने कामातून जिंकत राहिला, असा माणसांच्या जवळचा - त्यांच्या आपुलकीचा नेता पुन्हा होणे नाही. अशा अजित पवारांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!

## अरविंद पाटकर कालवश



**पुणे :** मनोविकास प्रकाशनाचे संस्थापक अरविंद पाटकर यांचं दुःखद निधन झालं. गिरणी कामगार चळवळीतून आलेले असले, तरी प्रकाशन व्यवसायातील ते एक ठाम आणि समृद्ध व्यक्तिमत्त्व होतं. ३५वर्षांहून अधिक काळ त्यांनी समाजप्रबोधनपर पुस्तकांना व्यासपीठ दिलं. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे अरविंद पाटकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स' साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books



# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय भाषण

### ९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा २०२६
### विश्वास पाटील यांचं अध्यक्षीय भाषण

माय मराठीच्या वाङ्मयप्रेमी रसिक बंधू-भगिनींना माझा मानाचा मुजरा.

इथे उपस्थित असलेल्या गतवर्षीच्या, दिल्लीच्या संमेलनाध्यक्षा डॉ.तारा भवाळकर. मी कॉलेजात शिकत असताना माझ्या पहिल्या वक्तृत्व स्पर्धेच्या परीक्षक आदरणीय ताराबाईच होत्या. त्यांच्या हातूनच मला वक्तृत्वाचा पहिला पुरस्कार मिळाला होता. म्हणजे, तेव्हाच खऱ्या अर्थी ताराबाईंशी माझ्या तारा जुळल्या होत्या. थोर भारतीय लेखिका मृदुला गर्ग, नवमहाराष्ट्राच्या प्रगतीची सतत स्वप्नं पाहणारे आणि ती स्वप्नं वास्तवात आणण्यासाठी अहोरात्र झटणारे या प्रगतिशील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस, ज्यांनी माझ्यासारख्या साहित्यिकावर शिर्डी येथील इन्टरनॅशनल एअरपोर्ट बांधण्याची



जबाबदारी सोपवली आणि मला ते स्वप्न पूर्ण करण्याचं भाग्य लाभलं. आपल्या दिमाखाकडे आणि प्रकृतीकडे पाहिल्यावर इतिहासातला राजा वास्तवात कसा असेल, याचं दर्शन घडवणारे आमचे कुर्रेबाज-करारी उदयनराजे भोसले.

या भव्य सोहळ्याचे स्वागतशील आणि विनम्र स्वागताध्यक्ष शिवेंद्रराजे भोसले. १९८६ साली जेव्हा मी मुंबईहून पानिपताकडे विमानाने निघालो होतो, तेव्हा अभयसिंहराजे माझ्या शेजारच्या खुर्चीवर बसलेले होते. 'पानिपत' या विषयावर मी त्यांच्याशी चर्चा करत असताना शेवटी त्यांनी मला एकच सल्ला दिला होता, 'विश्वासराव, असं काहीतरी लिहा की, 'पानिपत' या शब्दाला एक दिवस पुण्यपथाचा दर्जा प्राप्त होईल.' त्याच अभयसिंह राजेंच्या सुपुत्रांच्या; म्हणजेच शिवेंद्रराजेंच्या हातून इथे माझा सन्मान घडावा, हा मी दुग्धशर्करा-योग मानतो.

मिलिंद जोशी आणि विनोद कुलकर्णींची पहिल्यापासून अशी जाहीर मागणी होती की, सातारच्या या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अन् आपल्याला माहिती आहेच, सतरा भानगडींतून गावगाडा पुढे हाकायचा, म्हणजे पाटील आणि कुलकर्ण्यांना 'युती' करावीच लागते. या निमित्ताने मला इथे आमच्या पठ्ठे बापूरावांची एक लावणी आठवते-

*ही नटरंगी नार,*
*मारी काळजात वार*
*पाडी कासोट्याला पार, चापुनिया पट्टी*
*हिने पाटलाला घातला डोळा,*
*कुलकर्ण्याला केला खुळा*
*मास्तराने सोडली शाळा हिच्यासाठी!*

रसिक मित्रांनो, साताऱ्याच्या या भूमीमध्ये पहिले पाऊल ठेवताना मला आमचे गुरू बॅरिस्टर पी.जी.पाटील यांची आणि माझे वाङ्मयीन गुरू, श्रेष्ठ समीक्षक श्री. शंकर सारडा यांची प्रकर्षाने आठवण येते. प्राचार्य हातकणंगलेकर आणि कुलगुरू रा.कृ.कणबरकर यांचीही आठवण येते. त्याच वेळी माझ्या बालपणीचे; इथल्या रम्य पाचगणीच्या महात्मा फुले हायस्कूलमधले माझे मंतरलेले दिवस मला आठवतात.

माझ्या वाङ्मयीन वाटचालीत माझ्या उमेदीच्या काळात ज्यांनी मला आधार दिला, ते आमचे डॉ.आनंद यादव आणि मला धाकट्या भावासारखं प्रेम

करणारे मृत्युंजयकार शिवाजी सावंत, हे दोघेही आमच्या करवीरच्या मातीतले महान साहित्यिक. ते दोघेही सातारा जिल्ह्यातच साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊ घातले होते; परंतु त्या दोघांवरही काळाने आणि वेळेने घोर अन्याय केला. त्यांच्या स्मृतीला पहिलं अभिवादन करणं, हे मी माझं परमकर्तव्य समजतो.

माझ्या दृष्टीने ऐतिहासिक साताऱ्याची भूमी म्हणजे, निरा नदीच्या खळाळत्या पाण्यापासून ते पल्याड कोल्हापुराकडे वारणेच्या जलप्रवाहापर्यंत, तसंच एका बाजूला महाबळेश्वरच्या पर्वतरांगा आणि खाली पूर्वेकडे माणदेश-आटपाडी ते पलीकडे मिरज, कवठे-महांकाळपर्यंत पसरलेला जुना विस्तीर्ण मुलूख आमच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. हीच ती पुण्यभूमी, जी थोरल्या शाहू महाराजांच्या वास्तव्याने महत्पदास पोहोचली होती. इथल्या कण्हेरखेडच्या दत्ताजी शिंदेने राघोबादादा, मल्हारराव होळकर आणि समशेर बहादुराबरोबर १७५८मध्ये अटकेवर मराठ्यांचा भगवा झेंडा फडकावला होता. याच भूमीतले महादजी शिंदे, जे दिल्लीचे 'पाटीलबाबा' बनले होते आणि ज्यांच्या इशाऱ्यानुसार हिंदुस्थानच्या गादीवर अर्धा डझन मुघल बादशहा बसले होते. आमच्या छत्रपती शिवरायांच्या जीवनावर अप्रतिम आणि अजरामर काव्यरचना करणारे संत रामदास स्वामी, सातारच्या वैभव आणि स्वायत्ततेसाठी ब्रिटिशांशी संघर्षाचं रान पेटवणारे आमचे थोरले प्रतापसिंह महाराज, त्या प्रजाहितदक्ष राजाची कैफियत मांडण्यासाठी इंग्लंडमध्ये धाव घेणारे, तिथे जाऊन नव्याने इंग्रजी शिकून आपल्या वक्तृत्वाने ब्रिटिशांची पार्लमेन्ट हादरवून टाकणारे रंगो बापूजी गुप्ते, ज्यांनी 'राजा मेला तरी न्याय मेला नाही, माझ्या सातारच्या गादीला न्याय मिळालाच पाहिजे' अशी सिंहगर्जना इंग्लंडमध्ये केली होती. ब्रिटिशांच्या विरोधात राना-वनात स्वतःचं, गरिबांचं राज्य या भूमीत निर्माण करणारा आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक.

ब्रिटिश साम्राज्याला हादरा देणारे, प्रतिसरकार निर्माण करणारे आमचे क्रांतिसिंह नाना पाटील, जी.डी.लाड, नागनाथ नायकवडी ते किसन वीर, धनिणीच्या बागेत रयत शिक्षण संस्था स्थापन करून शैक्षणिक क्रांती घडवणारे आमचे कर्मवीर भाऊराव पाटील. तसंच इतिहासाच्या नभांगणात तेजस्वी तारकांसारख्या उजळलेल्या महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई, महाराणी दुर्गाबाई, दिल्लीच्या दरबारात महाराणीचा अचाट अभिनय करून दिल्लीकर बादशहाला स्वतःला 'माँसाहेब' म्हणून हाक मारायला भाग पाडणाऱ्या

मैनावती दासींसह क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापर्यंत या भूमीतल्या सर्व थोर माता-भगिनींना मी मानाचा मुजरा करतो.

ही भूमी मराठी 'नवकाव्याचे आद्य प्रणेते' बाळ सीताराम मर्ढेकर यांची आणि तत्त्वज्ञानाची पेठ निर्माण करणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात उतरणारे ॲड. व्ही.एन.पाटील आणि शेखकाका इथलेच. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित नेहरू आणि आचार्य कृपलानी यांच्या तेव्हाच्या उत्तर प्रांताचे; म्हणजेच आजच्या उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रिपद सलग सात वर्षं भूषवणारेसुद्धा सातारचे सुपुत्र होते, ज्यांचं नाव होतं, पंडित गोविंद वल्लभ पंत. कराडजवळच्या ओंड गावचे ते रहिवासी. शिवाय, देशपातळीवर 'लोकांचा राजा' म्हणून गाजलेले औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी, मालोजीराजे निंबाळकर, हरियाणाचे माजी राज्यपाल गणपतराव तपासे आणि त्रिपुरामध्ये मराठी माणसाचा झेंडा आणि तुरा नाचवणारे आमचे श्रीनिवास पाटील.

सातारा प्रांत म्हणजे एकीकडे इतिहासाच्या धडाडत्या तोफा आणि चौघडे आणि दुसरीकडे लोकसाहित्याचा पदन्यास... घुंगरांचा खणखणाट. यमुनाबाई वाईकर, कांताबाई सातारकर, आक्काताई कऱ्हाडकर, वर्धनगडचा रामा कुंभार, शाहीर साबळे, स्वातंत्र्य शाहीर निकम, दोन लाख लावण्या लिहिणारे शाहीर पठ्ठे बापूराव, तसंच भाऊ फक्कड, शाहीर मनवेकर, साहेबराव नांदवळकर, कृष्णाकाठचे गायक व अभिनेते बालगंधर्व, वाटेगाव वाळव्याचे शाहीर अण्णा भाऊ साठे. सातारा प्रांत म्हणजे, खऱ्या अर्थी साहित्यरत्नांच्या खाणी... ज्यांमध्ये आहेत- कृष्णेकाठचे जुन्या पिढीतले महान नाटककार देवल, खाडिलकर, तसंच साहित्यात माणदेशाचा मळा फुलवणारे ग.दि.माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकरराव खरात ते वामन ओव्हाळ, कोरेगावचे कादंबरीकार ना.ह.आपटे, ग.ल.ठोकळ, श्री.म.माटे मास्तर, कवी यशवंत, गिरीश, वसंत कानेटकर, लग्नाळू मुलीच्या डोळ्यांत सहज गंगा-यमुना उभ्या करणारे आमचे पी.सावळारामदादा ते अलीकडच्या पिढीतील डॉ.आ.ह.साळुंखे, 'उपरा'कार लक्ष्मण माने, आमचे मित्र पार्थ पोळके, ग्रामीण कथाकार व.वा.बोधे, 'मी साताऱ्याची गुलछडी मला रोखून पाहू नका' म्हणणारे आणि कोरोनामध्ये जगाचा निरोप घेणारे कवी मच्छिंद्र मोरे. उत्तम सामाजिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या आटपाडीच्या मेधा पाटील, विट्याचे रघुराज मेटकरी, शेतकरी कवी सुरेश

मोहिते, विजय बाबर, कवयित्री स्वाती शिंदे. दक्षिण महाराष्ट्रात साहित्याचा झेंडा फडकवणारे कथाकार दि.बा.पाटील, ईश्वरपूरचे कवी एकनाथ पाटील, गारगोटीचे चंद्रशेखर कांबळे, बहादूरवाडीचा धनाजी घोरपडे, ज्याचा जामिनावर सुटलेला घोडा थांबायचं नावच घेत नाही. ग्रामीण कथाकार बाबा परीट आणि आप्पासाहेब खोत.

मित्रांनो, साहित्य संमेलन म्हणजे केवळ हौशा-गौशांची जत्रा नसते, कोणा वधू-वरांच्या लग्नाचं ते वऱ्हाडही नव्हे; तर महाराष्ट्राच्या साहित्य, संस्कृती आणि अस्तित्वाला आकार व दिशा देणारी सर्वमान्य अशी प्रागतिक संघटना म्हणजे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. १८७८मध्ये जे आमचं पहिलं मराठी साहित्य संमेलन झालं, ज्याचा उल्लेख- आमच्या महात्मा फुल्यांनी 'पालमोड्यादादांचे संमेलन' असा केला... हा उल्लेख नेहमी टाळीच्या एका वाक्यासाठी केला जातो. त्याच्या पल्याड, खोलवर जाऊन तत्कालीन परिस्थितीचा अधिक गांभीर्याने विचार करायला हवा. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ला झाली. त्याच्याही आधी सात वर्षं आमचं मराठी साहित्य संमेलन जन्माला आलं आहे. म्हणजे, या देशाच्या भूत-भविष्याच्या विचाराला आरंभ होण्याआधी मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या गाभ्याला साहित्य संमेलनाने हात घातला आहे.

मुळात, न्यायमूर्ती रानडे यांनी साहित्य संमेलनाचा घाट घातला, त्या वेळी त्यांचं वय ३८ वर्षांचं होतं. नंतर बावीस वर्षांनी याच महादेव गोविंदांनी 'मराठा सत्तेचा उदयास्त' नावाचा मौलिक ग्रंथ लिहून प्रबोधनाला खऱ्या अर्थी इथे चालना दिली. देशाच्या आजादीचं आंदोलन असो की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ किंवा नामांतराचा लढा अगर आणीबाणीसारखा प्रसंग. प्रत्येक ऐतिहासिक आणि निर्णायकी वळणावार मराठी साहित्य संमेलन चार पावलं आघाडीवरच राहिलं आहे.

१५ ऑक्टोबर, १९३८ या दिवशी मुंबईत भरलेल्या २३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर होते. जेव्हा साहित्यिकांना 'लेखण्या मोडा आणि तलवारी हाती घ्या,' असा संदेश त्यांनी दिला होता, तेव्हा सावरकरांच्या अध्यक्षतेखाली १९३८मध्ये; म्हणजेच ८७ वर्षांपूर्वी भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात दुसऱ्या क्रमांकाचा असा ठराव पास झाला होता की, 'हिंदुस्थानातील सर्व प्रमुख देशी भाषांची

वाढ होऊन, प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच महाविद्यालयीन शिक्षणही त्या-त्या प्रांतातील देशी भाषेतून दिले जावे.'

जेव्हाजेव्हा भाषेवर, राष्ट्रावर आणि संस्कृतीवर संकट येतं, तेव्हातेव्हा गेल्या दोनशे वर्षांत सामाजिक नेतृत्वाची आणि प्रसंगी राजकीय पुढाकाराची भूमिकासुद्धा साहित्यिकांनी उचललेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावेळी मोरारजी देसाईंनी आचार्य अत्रे यांना सत्तर दिवस तुरुंगात टाकलं. तसंच, एका वगनाट्य-लेखनाच्या कारणावरून त्याच मोरारजींनी आमच्या शाहीर अण्णा भाऊ साठेंना हद्दपार केलं होतं. त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. कवीच्या हृदयातून आलेले सच्चे शब्द प्रसंगी सत्तेच्या सिंहासनासमोर झुकत नाहीत, हे या भूमीतल्या साहित्यिकांनी वेळोवेळी दाखवून दिलं आहे. आमच्या मुंबईचेच नागरिक असलेले प्रसिद्ध कवी मजरूह सुल्तानपुरी यांनी एकदा पंतप्रधान पंडित नेहरूंच्या परराष्ट्र-धोरणावर टीका केली होती. त्याबद्दल मजरूह यांना दोन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. मोरारजी म्हणाले, ''माफी मागा, सुटका होईल.'' कविराज मजरूह बोलले,''कवीचे प्रांजळ शब्द म्हणजे भात्यातून सुटलेले बाण असतात. दोनाऐवजी चार वर्षांची शिक्षा दिलीत, तरी माघार घेणार नाही.''

या 'सातारा साहित्य संमेलना'च्या तारखा घोषित झाल्या आणि नेमकी राजकीयदृष्ट्या नाजूक वेळ उगवली. आता महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता घोषित झाली आहे. तुमची आचारसंहिता असेल, तर आमची विचारसंहिता असते! तुमच्या आचारसंहितेची मुदत फक्त चार-दोन आठवड्यांपुरती असते, तर साहित्य संमेलनाच्या मंथनातून निघालेल्या विचारशलाकांचा अंमल चार-चार दशकंसुद्धा टिकून राहतो, हा या भूमीचा इतिहास आहे.

मित्रहो, 'अध्यक्ष' या नात्याने मी मांडलेले विचार हे 'स्वतंत्र' असतील. ते कोणा एका राजकीय संप्रदायाच्या बाजूचे आहेत की विरोधातले असं ठरवण्याचा बादरायण खटाटोप कृपया कोणी करू नये. मराठी साहित्य, मराठी भाषा, तिचे अस्तित्व, मुंबईसारख्या आमच्या नगरीचं भवितव्य यांबाबत काही रोखठोक मुद्दे असतील, जे कोणाला आवडतील किंवा नाहीही; पण ते मांडणं मला क्रमप्राप्त आहे. ते तुम्ही माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीचं उत्तरदायित्व असेल.

आज या संमेलनाचा 'अध्यक्ष' या नात्याने ही संधी देशाच्या आझादीसाठी

आणि  संयुक्त महाराष्ट्रासाठी झुंज दिलेल्या एका कार्यकर्त्याच्या मुलाला मिळाली आहेच; पण त्याहीपेक्षा एका अशिक्षित शेतकरी मातेच्या लेकराकडे हे पद चालून आलं आहे, या गोष्टीचा मला अतिशय आनंद वाटतो.

मी इयत्ता दहावीमध्ये असताना पुण्याच्या 'तरुण भारत'च्या कथास्पर्धेत माझ्या स्त्री-प्रश्नावरच्या 'कायदा' नावाच्या कथेला महाराष्ट्र स्तरावरचा पुरस्कार मिळतो. वयाच्या १७व्या वर्षी 'आंबी' नावाची स्त्रीप्रधान कादंबरी लिहिणं, वयाच्या बाविशीत 'पानिपत'सारख्या विषयाला हात घालणं, २७व्या वर्षी 'पांगिरा', २८व्या वर्षी 'पानिपत', ऐन तिशीमध्ये 'झाडाझडती' अशा प्रगल्भ कलाकृती इतक्या तारुण्यात माझ्या हातून कशा प्रसवल्या होत्या, याचं आज मला आश्चर्य वाटतं; पण त्याबाबत सखोल चिंतन करता, त्या प्रश्नाचं एकच उत्तर मिळतं. ते म्हणजे, माझं माझ्या महन्मंगल मराठी मातीवर, इथल्या थोर संस्कृतीवर आणि गौरवशाली इतिहासावर जडलेलं प्रेम... जे अजूनही माझ्या रक्तमांसाचा, ध्यासाचा आणि श्वासाचा एक अविभाज्य भाग बनून राहिलं आहे.

तशी, लेखक घडण्यासाठी पूर्णतः विषम परिस्थिती माझ्या वाट्याला आली होती. माझ्या नेर्ले गावची लोकसंख्या बाराशे चौतीस. शिकलो जिल्हा परिषदेच्या शाळेत आणि मारुतीच्या मंदिरात; पण गावपरिसराला संपन्न निसर्गाचा वारसा होता. वारणा नदीचे महापूर, पाठीशी सह्याद्रीच्या रांगा, एकीकडे पन्हाळगड, दुसरीकडे विशाळगड आणि दूर पलीकडे प्रचितगड अशी शिवरायांच्या इतिहासाने माझी पाठराखण केली होती.

लोकसंगीत, लोकगीतं, तमाशा, भारूड यांच्या संगतीत बालपण गेलं. एकदा गुरुजींनी कवितेच्या तासाला वर्गातल्या विद्यार्थ्यांना आवडत्या कविता म्हणायचा हुकूम सोडला. कोणी म्हणाले, 'लाडकी बाहुली होती माझी एक', तर कोणी म्हणाले, 'ढुम ढुम पट ढुम लेजीम चाले जोरात.' मी आपला ठेवला कानावर हात आणि केली सुरुवात...

*नेसली गं बाई चंद्रकळा टिपक्याची*
*तिरपी नजर माझ्यावर या सावळ्या हरीची*
*शीळ घालूनी करतो गोळा, गोपाळांचा मेळा*
*राधिकेला अडवून धरितो, मिठी मारतो गळा*

*शर्थ झाली बाई याच्या निर्लज्जपणाची*

मध्येच गुरुजी ओरडले, ''पाटील थांबाऽऽ..! अहो, ही शाळा आहे, तमाशाची कनात नव्हे! घ्या दप्तर आणि पडा शाळेबाहेर.'' तेव्हा शेतात गेलेले माझे चुलते हातात भाल्याची काठी घेऊन तसेच शाळेत शिरले. विचारू लागले, ''मास्तर, काय चुकलं काय आमच्या लेकराचं?''

गुरुजी बोलले, ''हे काय लेकरू आहे? राधिकेला मिठ्या काय मारतंय, आवळून काय धरतंय. हा विद्यार्थी आमच्या शाळेला परवडणारा नाही. घ्या दप्तर आणि पडा बाहेर.'' तेव्हा चुलते भांडले, ''पोराचं काय चुकलं ते तरी सांगा?'' घडलेला सारा प्रकार समजल्यावर चुलत्यांनी मास्तरांना हसत प्रतिप्रश्न केला,

''अव्हो गुरुजी, किती तुम्ही अडाणी. हे गाणं कोणी लिव्हलं येवढं तरी विचारा की! गुरुजी, हे गाणं लिव्हलंय संत एकनाथ महाराजांनी. अन् ज्या शाळेत एकनाथांचे शब्द चालणार नसतील, ती शाळाच आम्हाला नगो.''

अनेकदा माझ्या साहित्यिक कारकिर्दीचा विचार करताना मला हाच प्रश्न पडतो- मी नेमका कोण आहे? 'झाडाझडती', 'लस्ट फॉर मुंबई', 'नागकेशर', 'दुडिया', 'अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान'सारखी ग्रंथसंपदा लिहिणारा सामाजिक लेखक की ऐतिहासिक कादंबरीकार? उजवा की डावा? माझ्या मते, I am neither left, nor right, but I am upright. मी डावाही नाही आणि उजवाही नाही; मात्र माझ्या हाती मानवतेचं निशाण आहे.

मित्रांनो, लेखक किंवा कवीला कोणतीही जात नसते.

मात्र त्याला धर्म असतो.

जो धर्म असतो, तो फक्त मानवता धर्म!

माझ्यातल्या कादंबरीकाराला सातारच्या सकस मातीने घडवलं आहे, ही वस्तुस्थिती. पिण्याचं पाणी आणि शेतीचं पाणी, तसंच ग्रामीण भागातील उद्‌ध्वस्त माळरानं या पार्श्वभूमीवर 'पांगिरा' नावाची कादंबरी मी इथे फलटणच्या वास्तव्यात लिहिली. 'पानिपत'सारखी अव्वल कलाकृतीसुद्धा मला सुचली ती इथे साताऱ्याच्याच मातीमध्ये. इतकंच नव्हे; तर 'झाडाझडती'चा नायक खैरमोडे गुरुजी मला इथेच भेटला. जेव्हा आंधळी धरणाच्या निर्मितीसाठी केळी आणि पेरवीच्या बागांना दहिवडीकडे बुलडोझर लावले गेले होते, तेव्हा

त्या जुलमाविरुद्ध धावून आलेले कॉम्रेड वर्धमान निकम किंवा कृष्णाकाठच्या पुराच्या पाण्यात बुडणारा आपला महारवाडा वाचवण्यासाठी संघर्षाच्या समरांगणात उतरलेले सावंत गुरुजी, तसंच उजनीच्या धरणग्रस्तांसाठी झुंजणारे प्रा.तु.मा. सरडे गुरुजी, याशिवाय 'बळीराजा'वाले संपतराव पवार आणि भारत पाटणकर, संतराम पाटील, नाना शेटे आणि यशदा व इतरत्र ऐकलेली बाबा आढाव आणि मेधा पाटकर यांची भाषणं; अशा लढाऊ कार्यकर्त्यांच्या परंपरेने माझ्या लेखणीतला खैरमोडे गुरुजी घडवला.

मनुष्यप्राणी आणि वन्यप्राणी यांच्या संबंधांचा नव्याने विचार करण्याची वेळ आली आहे. 'जंगलबुक' नावाचा अमर ग्रंथ सव्वाशे वर्षांपूर्वी रुडयार्ड किपलिंग या महान लेखकाने लिहिला. अलीकडे 'दंगल' सिनेमाची खूप तारीफ झाली; कारण मुली मुलांना कुस्तीमध्ये हरवतात; पण १०० वर्षांमागे कोल्हापूर परिसरात आमच्या खडकलाटच्या तारा शिंदेसारख्या मुली वाघांशी कुस्ती खेळून त्यांना चितपट करायच्या. या पार्श्वभूमीवर, मी अलीकडेच लिहिलेली 'द ग्रेट कांचना सर्कस' नावाची कादंबरी अनेक भारतीय भाषांमध्ये सध्या गाजत आहे. दुसऱ्या महायुद्धात जपानने रंगून शहरावर केलेली बॉम्बफेक आणि 'कांचना' नावाच्या सर्कस मालकिणीने दऱ्या-खोऱ्यांतून आपल्या हत्ती-घोड्यांसह केलेला अडीच हजार किलोमीटर लांबीचा प्रवास हा तिचा विषय आहे.

आज शेतकऱ्यांच्या पिकाला पाणी देण्यासाठी इलेक्ट्रिसिटी बोर्ड मर्यादित वेळ वीज देते. त्यामुळे, वाळणारी पिकं वाचवण्यासाठी शेतकरी रात्रीचे सापाच्या फणीवर पाय ठेवून उसात उतरतात. आता तिथे बांधाबांधावर बिबटेभाऊ त्यांच्या स्वागतासाठी हजर आहेत. नुकत्याच असेम्ब्लीमध्ये सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, एकट्या जुन्नर तालुक्यात गेल्या २५ वर्षांत ५४ व्यक्ती मृत्युमुखी आणि १५० जखमी झाल्या. या बिबट्यांनी शेतकऱ्यांची सुमारे २६ हजार जनावरं ठार मारली. हा प्रकार फक्त एका जुन्नर तालुक्यातला. तिकडे कर्नाटकाच्या हद्दीवर जंगली हत्ती रानंच्या रानं उद्ध्वस्त करत सुटले आहेत.

कोर्टामधून घाईघाईने हुकूम मिळवून प्राण्यांना आमच्यापासून दूर पळवणाऱ्या या तथाकथित प्राणिमित्रांना आमच्या संस्कृतीचा आणि मानव व पशूंच्या पूर्वापार नात्यांचा इतिहासच ठाऊक नाही. खरंतर, मौर्यकाळापासून वनराज हत्ती जंगल सोडून नगरानगरांत मनुष्यमात्रात येऊन मिसळला. पोटच्या

पोराप्रमाणे पुढे हजारो वर्षं गावोगावच्या मंदिरांमध्ये आणि मठांमध्ये हजारो हत्तींचं पालन व्हायचं. हे प्राणिमित्र चौपाटीवर घोडी फिरू देत नाहीत, यांनी मठामठांतील ऋषिमुनींचे पूर्वापार हत्ती नेले. अलीकडेच 'महादेवी' हत्तिणीच्या संरक्षणासाठी हजारो नागरिक आणि गावंच्या-गावं डोळ्यांतले अश्रू आवरत रस्त्यावर उतरली होती. हत्तीपालन आणि अश्वपालन सम्राट अशोकापासून शिवाजीराजांपर्यंत अनेक युगप्रवर्तक महापुरुषांनी केलं आहे. हत्ती-घोड्यांचं पालन, संगोपन, आरोग्य व आहार या विषयावर पुरातन काळापासून शास्त्रोक्त विचार आणि संशोधन झालेलं आहे. तिसऱ्या शतकाच्या दरम्यान मातंग ऋषींनी 'गजशास्त्र' लिहिलं. अश्वशास्त्र किंवा अश्वपरीक्षेबाबत शालिहोत्र मुनींनी पुरातन काळी सखोल संशोधन आणि लेखन केलेलं आहे. त्या पागांची व पिलखान्यांची कसलीही माहिती या सो-कॉल्ड प्राणिमित्रांना नाही.

एका कुठल्यातरी सर्कशीत अपघाताने २५-३० जनावरं मृत्युमुखी पडली. म्हणून भारतातील सर्कशीमध्ये प्राणी वापरावर बंदीच आणली गेली. अरे, दर वर्षी मोटार अपघातामध्ये १ लाख ७७ हजार माणसं मृत्युमुखी पडतात; म्हणजे जसरासरी ४८५ लोक मरण पावतात, म्हणून वाहतुकीसाठी रस्तेच बंद करायची तुमच्यामध्ये आहे का हिंमत? लक्षात ठेवा- भारतीय सर्कशीची पाठराखण या भूमीमध्ये लोकमान्य टिळक, लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी यांनी केली आहे. सर्कशीची जन्मभूमी केरळच्या आधी मुंबई प्रांत आणि त्यातही आमच्यापूर्वीच्या सातारा जिल्ह्यातील तासगाव ही आहे. एकट्या तासगावात एके काळी राष्ट्रीय दर्जाच्या १५ सर्कशी होत्या. या पार्श्वभूमीवर, बिबटे आणि रानटी हत्तींसारखे प्राणी मोकाट सुटण्याऐवजी सर्कशीमध्ये वापरायला पुन्हा परवानगी द्या- अशी मी समाजाला व शासनाला विनंती करतो. प्राणिमित्रांनी समाजास वेठीस धरण्याचा आगाऊपणा करू नये.

शंभर वर्षांमागे; म्हणजे १९२७मध्ये केम्ब्रिज विद्यापीठामध्ये जगप्रसिद्ध कादंबरीकार ई.एम.फॉस्टर याने 'अस्पेक्ट्स ऑफ द नॉव्हेल' म्हणजेच 'कादंबरी वाङ्मयाचे घटक' या विषयावर खूप मोठी व्याख्यानं दिली होती. कथा, व्यक्तिरेखा आदी घटकांवर विस्तृत चर्चा केली. पुढे अभ्यासकांनी नाट्य आणि संघर्ष या दोन विशेष घटकांनाही महत्त्वाचं स्थान दिलं आहे.

'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार तर पूर्णतः परदेशी म्हणता येणार नाही. भेदिकाची रात्ररात्रभर चालणारी गाणी, सुंबरानं मांडलं गा म्हणत धनगरांची

रात्ररात्रभर ढोल आणि खैताळावर रंगणारी दीर्घ कथानकं आणि त्यांचे पट कादंबरीसदृश आहेत. दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटक यांच्या हद्दीवर एका रेल्वे-स्टेशनवरच्या घटनेतून निर्माण झालेली काशीबाईची लावणी, चिल्याबाळाची गोष्ट, बटऊमोहनाचा वग या साऱ्या कथानकांचा पट हा मूलगामी कादंबरी आणि नाटकांचाच पट वाटतो. रामायण आणि महाभारताच्या कथा हा व्यास आणि वाल्मिकींसारख्या शब्दप्रभूंच्या लेखणीचा महाचमत्कार आहे.

आपल्याकडे स्वातंत्र्याच्या आंदोलनावर किंवा संयुक्त महाराष्ट्राच्या जनांदोलनाची दाहकता दाखवणारी अगर ज्या पुण्यामध्ये बुद्धीचे बृहस्पती राहतात, त्या पुण्यातल्या पानशेतच्या प्रलयावर एखादी जबरदस्त कादंबरी घडलेली नाही. याच पार्श्वभूमीवर सांगायचं, तर श्रेष्ठ आसामी लेखक श्री. वीरेंद्रकुमार भट्टाचार्य यांची 'लोकांचे राज्य' ही अतिशय उत्कृष्ट कलाकृती मान्य करावी लागेल... जिचं आपल्या कवयित्री शान्ता शेळके यांनी नितांत-सुंदर भाषांतर केलं आहे.

या भूमीतल्या शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला हात घालणारा पहिला बंडवाला विद्रोही साहित्यिक म्हणजे महात्मा जोतिबा फुले. ज्यांनी 'शेतकऱ्याऱ्यांचा आसूड' नावाची महागाथा १८८१मध्ये लिहिली. शेतकरी नावाच्या दरिद्रीनारायणाची कैफियत इंग्रज साहेबाला कळावी म्हणून ते सामान्य कुणब्याच्या पेहरावात ब्रिटिश साहेबाला भेटले, असं मानतात. शेतकरी वर्गाची परवड आमच्या सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' कादंबरीमध्ये उत्तम पद्धतीने मांडली आहे. व्यंकटेश माडगूळकरांची 'काळी आई', आनंद यादवांचा 'गोतावळा', उद्धव शेळके यांची 'धग', र.वा.दिघे यांची 'आई आहे शेतात' अशा आमच्या साहित्यकृतींनी शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदना मांडल्या आहेत.

मात्र, आज नोकरी नाही, म्हणून प्रत्येक खेड्यात शेकडो मुलं बिनलग्नाची आहेत. बेकारीत पोळणाऱ्या मुलाशी लग्न करण्याऐवजी डोक्यावर अक्षताच न पडलेल्या बऱ्या, अशा विचाराने शेकडो मुलींचे विवाह लांबणीवर पडले आहेत. शेतीमालाला भाव नाही, ही भयानक शांतता आणि अस्वस्थता उद्याच्या भीषण भविष्याला आमंत्रण देणारी आहे, हे बिलकूल विसरू नका.

माझ्या हातून 'पांगिरा', 'झाडाझडती', 'लस्ट फॉर मुंबई' अशा सामाजिक महत्त्वाच्या कादंबऱ्यांचं लेखन झालं, याचं मला जरूर समाधान आहे; मात्र एका

गोष्टीचं मला खूप दुःख वाटतं, ते असं की, आमच्या पिढीतल्या साहित्यिकांनी जाणीवपूर्वक शेतकरी आत्महत्यांच्या दुष्ट पर्वामागच्या दुःखाची कारणमीमांसा आपल्या साहित्यातून सखोलपणे व्यक्त करायला हवी होती.

१९ मार्च, १९८६ रोजी साहेबराव कर्पे नावाच्या चिलगव्हाणच्या शेतकऱ्याने कुटुंबीयांसह पहिली आत्महत्या केली. १९९५ ते २०२२; म्हणजे २७ वर्षांत ९६ हजार, २४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २०२४मध्ये हा आकडा २ हजार, ६३५ वर गेला आहे, याचा दुसरा सरळ अर्थ दिवसाला सुमारे एक किंवा एकाहून अधिक शेतकरी आजही या महाराष्ट्र भूमीमध्ये आपलं जीवन संपवत असतात.

बळीराजांच्या आत्महत्यांचं हे विषारी पर्व म्हणजे, या भूमीतील सर्व राजकीय पक्षांचं, समाजाचंच नव्हे; तर आम्हा लेखक कलावंतांचंसुद्धा अपयश आहे. मातीतून मोती फुलवणाऱ्या गरीब कष्टकऱ्यांना झाडाला टांगून स्वतःचं जीवन संपवताना किती यातना होत असतील. गेल्या ४४ वर्षांत शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागचं कारण शोधणं आणि त्याचं निवारण करणं हे कोणालाही जमलेलं नाही. अन् खरं कारण म्हणजे काय, तर शेतकऱ्याला शेतीचा धंदा करणंच परवडत नाही. म्हणून तो म्हणे मरणाला मिठी मारतो. याच्या उलट गेल्या ४४ वर्षांत, म्हणजेच जवळपास गेल्या अर्धशतकाच्या प्रवासात, कोणाही सरकारी अधिकाऱ्याच्या कुटुंबाने किंवा त्यांच्या नातेवाइकाने, अगर साध्या नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधीपासून संसदेपर्यंतच्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीने अगर त्याच्या जवळच्या नातेवाइकाने सुरू केलेला कोणताही धंदा कधी बुडाला आहे, असं कोणाला दाखून देता येईल का? मग बिचाऱ्या शेतकऱ्यांच्याच वाट्यास हे असं दुःखी जीवन का यावं?

आज इथे या ठिकाणी, एका शेतकरी मातेचा पुत्र साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाला, या गोष्टीची जाणीव ठेवून मी शासनाकडे कळकळीची विनंती करतो आहे की, लाडक्या बहिणीप्रमाणेच मातीशी झट्या घेऊन धान्य पिकवणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याच्या पत्नीचा व मातेचा गौरव व्हायला पाहिजे. त्यासाठी 'लढाऊ धरतीमाता' नावाची नवी योजना हाती घ्यावी, एकीकडे त्या मतदान करण्यासाठी उपयोगी पडतीलच; पण त्याच वेळी जात शेतकऱ्याची असल्यामुळे त्या अन्नधान्य पिकवण्याचा आपला मूळ धर्मसुद्धा अजिबात विसरू शकणार नाहीत, याची मला खात्री आहे. कोणी म्हणेल कर्ज वाढतं

आहे. तुम्हाला माहिती आहे, उसाच्या चिपाडाला मराठवाड्याकडे 'पाचट' म्हणतात. मराठीमध्ये एक म्हण आहे, 'भरलेल्या बैलगाडीला चिपाडाचं किंवा पाचटाचं काय ओझं?' त्यामुळे या योजनेच्या खर्चाने फारसा फरक पडणार नाही. श्रेष्ठ कादंबरीकार बाबू बिरादार यांचं अलीकडेच झालेलं दुःखद निधन काळजाला चटका लावून गेलं. नांदेड जिल्ह्यात देगलूरजवळच्या खेड्यात राहणारे बिरादार यांनी 'अग्निकाष्ठ', 'मभूति', 'अंतःपुरुष' अशा एकाहून एक उत्तम कादंबऱ्या लिहिल्या; पण लाग्याबांध्याच्या दुष्ट वर्तुळात अडकलेल्या आजच्या समीक्षेच्या ठायी बाबूरावांच्या विराट कर्तृत्वाचा आवाका पकडण्याची ताकद नव्हती. आम्ही अण्णा भाऊंचं पूर्वउदाहरण ध्यानात ठेवून असं सांगू की, आजची मराठी समीक्षा ही तद्दन विद्यापीठीय, संकुचित मनोवृतीची आहे. ती नव्या साहित्यिकांसाठी अजिबात स्वागतशील नाहीच; उलट ती साहित्याच्या मंदिरात दुकानदारीसारखी आपापल्या गटाचे ठेले, सवते-सुभे तयार करून बसण्यात आनंद मानते.

मराठीचं दालन दलित आत्मचरित्रांनी आणि कवितांनी, तसंच भटक्या विमुक्तांच्या कसदार लेखणीने समृद्ध करून सोडलं आहे. आमचे मित्र शरणकुमार लिंबाळे हे तर भारतीय स्तरावर एक स्टार ललित-लेखक बनले आहेत. मल्याळी भाषेमध्ये ते इतके लोकप्रिय आहेत की, एके काळी तामिळ लोक वि.स.खांडेकर यांना 'तमिळ लेखक'च म्हणायचे, असं लिंबाळे यांनी मल्याळी भाषेमध्ये स्थान मिळवलं आहे. आज मायमराठीमध्ये कादंबरी क्षेत्रात अनंत सामंत, रवींद्र शोभणे, आसाराम लोमटे, लक्ष्मण गायकवाड, योगीराज बागूल हे 'उत्तम कादंबरीकार' म्हणून सिद्ध झाले आहेतच, शिवाय आजच्या पिढीचे उत्तम 'प्रयोगशील कादंबरीकार' म्हणून अशोक पवार आणि बाळासाहेब लबडे यांची नावं घ्यावी लागतील.

शिवाय, संजय भास्कर जोशी, सुनीता बोर्डे, डॉक्टर क्षमा शेलार, देवीदास सौदागर, सुरेश पाटोळे, प्रणव सखदेव, प्रदीप कोकरे, बबन मिंडे ही नावंसुद्धा महत्त्वाची आहेत. त्यामानाने आपण लोकसाहित्य आणि परंपरेबद्दल लेखन करणाऱ्या उत्तम समीक्षकांकडे दुर्लक्ष करतो. लोकसाहित्याच्या प्रांगणात प्रकाश खांडगे, डॉक्टर विश्वनाथ शिंदे, तसंच प्रभाकर होवाळ, सोपान खुडे, संपतराव पार्लेकर, शामल गरुड, संतोष खेडलेकर ही नावं उत्तम योगदान देताना दिसतात. समीक्षेच्या क्षेत्रात डॉक्टर रणधीर शिंदे यांची चौफेर मुशाफिरी, तसंच नितीन

रिंढे, मिलिंद कसबे आणि हरिश्चंद्र थोरात यांचं कामही खूप महत्त्वाचं आहे.

कथेच्या प्रांगणात पंकज भोसले, गणेश मतकरी, प्रियांका पाटील, शिल्पा कांबळे, स्नेहा अवसरीकर, मधुकर धर्मापुरीकर ही नावे महत्त्वाची आहेत. प्रज्ञा लोखंडे आणि अनुराधा पाटील यांची कविता दिसामासाने अधिकच प्रगल्भ होताना दिसते. शिवाय, महेश केळुस्कर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, राजन लाखे, अशोक नायगावकर, अशोक गुप्ते, साहेबराव ठाणगे, किरण येले, इंद्रजित भालेराव आणि इंद्रजित घुले, किशोर कदम, कल्पना दुधाळ, दासू वैद्य, मीनाक्षी पाटील, निर्मोही फडके, संजय कृष्णा पाटील, संतोष पवार, मनीषा उगले, कणकवलीचे मोहन कुंभार यांची कामगिरीही वरच्या श्रेणीची आहे. विशेषतः, महाराष्ट्राच्या जिल्हा परिषदा आणि ग्रामीण भागातून अनेक कवयित्री आणि बालसाहित्यातील मंडळी साहित्य-शारदेच्या दरबारात जोमाने पुढे येऊन भर घालताना दिसतात. यांमध्ये निशा डांगे, आशा डांगे, सविता जमाले-करंजकर, संजीवनी पाटील, रोहिणी पांडे, अनिता यलमाटे, डॉक्टर स्मिता पाटील, डॉ. कैलास दौंड ही नावं अग्रेसर आहेत.

जगातील अनेक शास्त्रज्ञ, संशोधक आणि त्यागी व पराक्रमी पुरुषांची जीवनचरित्रं आणि इतिहासग्रंथ मी वाचले. शेवटी मन थांबलं, ते एकाच मंत्रपावलांशी... ती पावलं म्हणजे, ‘छत्रपती शिवराय.’ शिवाजीराजांच्या जीवनावरील ‘महासम्राट’ नावाची कादंबरी मालिका मी लिहायला घेतली आहे. त्यांपैकी आत्तापर्यंत ‘झंझावात’, ‘रणखैंदळ’ आणि राजांच्या आग्रा मोहिमेचा नवा संशोधित वेध घेणारी ‘अस्मानभरारी’ नावाची कादंबरी नुकतीच प्रकाशित झालेली आहे.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सामाजिक इतिहासाचा शोध घेताना ‘कृष्णराव केळुसकर गुरुजी’ या नावाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मालवणाकडे शिक्षकी पेशात काम करणाऱ्या केळुसकर गुरुजींनी छत्रपती शिवरायांच्या अद्ययावत चरित्राचा संपन्न वारसा आम्हाला दिला. त्यांच्याच लेखणीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषाला भगवान बुद्धचरित्राचा आरसा दिला.

कोणतंही राज्य चालवताना त्याचं अर्थकारण महत्त्वाचं असतं. त्यामुळेच शिवरायांनी हिंदवी स्वराज्यासाठी सुरत, जालनापूर, हुबळी, अहमदनगर, जुन्नर, राजापूर ते वेल्लोर आणि जिंजीपर्यंतसुद्धा मुशाफिरी केली व मोहिमा

राबविल्या. हिंदवी स्वराज्याच्या वृद्धीसाठी पैसा उभारला. आजच्या भाषेत निधी निर्माण केला; परंतु शिवरायांच्या स्वराज्याचा पाया हा निधी नव्हे; तर न्याय आणि नीतीवर आधारलेला होता. आणि जिथे न्याय वेळेत मिळत नाही, तिथे अवनीतीची कळा चढते, हे सूत्र शिवरायांनी प्रमाण मानलं होतं.

चवदार तळ्याच्या वाटेवर असताना डॉ.आंबेडकर यांच्या जीवनात घडलेल्या एका घटनेला दंतकथेचं स्वरूप प्राप्त झालं आहे. वाटेतल्या एका गावात गावच्या पंच परमेश्वरासमोर एक वाद काही महिने चालू होता. तो वेळेत निकालात निघत नव्हता. तेव्हा त्या गावातून पुढे जाणाऱ्या गावकऱ्यांनी कायदा क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती म्हणून आंबेडकरांना सल्ला विचारला. न्यायदानाची मुदत किती ठेवावी किंवा लांबवावी? तेव्हा गावकऱ्यांच्या भाषेत डॉ. आंबेडकरांनी सांगितलं की, आपल्या कन्यचे तिच्या पहिल्या बाळंतपणावेळी पोट दुखू लागलं असेल तर, त्या नातवंडाच्या जन्माआधीच आवश्यक तो दवा आणि ओवा तिला द्यायला हवा. ते औषध जर तुम्ही दुसऱ्या किंवा तिसऱ्या नातवंडासाठी राखून ठेवाल, तर तो व्यवहारही नव्हे आणि न्यायही नाही.

अनेकदा, शिवरायांची तुलना नेपोलियन बोनापार्ट यांच्याशी केली जाते. दोघेही अल्पायुषी. नेपोलियन ५२ वर्षांचं, तर शिवरायांना अवघं ४९ वर्षांचं आयुष्य लाभलं. नेपोलियनचं साम्राज्य त्यांच्या हयातीत नष्ट झालं; परंतु जगाच्या हृदयसिंहासनावरून शिवराय अद्यापि खाली उतरले नाहीत.

शिवरायांच्या जीवनावर नुकतीच माझी 'अस्मानभरारी' ही कादंबरी प्रकाशित झाली. औरंगजेबाच्या साडेदहा लाख सैनिकांच्या शस्त्रसामर्थ्याला दाद न देता शिवराय कसे औरंगजेबासारख्या खुनशी बादशहाच्या हातावर तुरी देऊन प्रयाग, अमरकंटक, बघेलखंड, बुंदेलखंड, आजच्या भाषेत झारखंड आणि छत्तीसगडच्या निबिड अरण्यातून धाडसाच्या वारूला महापराक्रमाचे पंख लावून ध्यासाने निसटून आले. त्या प्रवासात पलामू झारखंड राज्यातील मेदिनीरायसारख्या आदिवासी राजाने व जनतेने शिवरायांना सटकून जाण्यासाठी मोठी मदत केली होती. या प्रसंगी जिजाऊसाहेब शिवरायांना विचारतात, ''बाळराजे, औरंगजेबाच्या साडेदहा लाख फौजींच्या शस्त्रसामर्थ्याला तोंड देऊन तुम्ही इकडे आमच्या भूमीपर्यंत येऊन पोहोचला तरी कसे?'' तेव्हा राजे सांगतात,

''आऊसाहेब, आम्ही निघून येण्यासाठी असा मार्ग पत्करलेला होता

की, जो औरंग्याच्या अब्बूच्या, अब्बूच्या, अब्बूच्या, अब्बूच्या स्वप्नातसुद्धा दिसणार नाही.''

२०११मध्ये भारत सरकारने देशातील ११ वरिष्ठ लेखक-कवींना चीनच्या दौऱ्यावर पाठवलं होतं. त्या शिष्टमंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ बंगाली साहित्यिक सुनील गंगोपाध्याय होते... ज्यामध्ये माझाही समावेश होता. तेव्हा मी चीनच्या शांघाय बेटाला भेट दिली. एके काळी शांघाय ही महानगरी म्हणजेसुद्धा चीनमधील एक मोठं गिरणगावच होतं. तिथे मुंबईसारख्या ६०-६५ कापड गिरण्या होत्या. मूळ शांघायमधला एकही गिरणी कामगार आता त्या शहरात उरला नाही. त्यांचे वंशज रोज ७०-८० किलोमीटर अंतरावरच्या खेड्यांतून रेल्वेच्या दांड्याशी लोंबकळत रोजगारासाठी शांघायमध्ये येतात.

याच पार्श्वभूमीवर, मी जेव्हा आमच्या मुंबईच्या गिरणगाव, लालबाग आणि परळचा विचार करतो. माझे दोन सख्खे चुलते हे मिल मजदूर होते. माझ्या बालपणी मी पाहिलेली ती मुंबई, जी सकाळच्या गिरण्यांच्या भोंग्यावर जागी व्हायची. तिची कहाणी नारायण सुर्वे, बा.सी.मर्ढेकर आणि नामदेव ढसाळांनी आपापल्या काव्यांतून सांगितली आहे. मुंबई नावाच्या महानगरीत जवळपास ६५ गिरण्या, २ लाख ८० हजारांहून अधिक गिरणी कामगार आणि गिरण्यांवर आधारित अशा इतर उद्योगधंद्यांतील मिळून आठ लाख कामगार आणि त्यांचे कुटुंबकबिले जगत होते.

परळ लालबागेत ज्याला गाववाल्यांच्या खोल्या म्हटल्या जायच्या, त्या एकेका एका दहा बाय पंधराच्या खोलीत किमान सत्तर-सत्तर कामगार राहायचे. गिरणीतल्या कामाच्या पाळीसारख्या झोपायलासुद्धा पाळ्या असायच्या. खरं युद्ध सकाळी सुरू व्हायचं, संडासांची संख्या मर्यादित. त्यामुळे डालड्याचा डबा हाती घेऊन ४०-४० लोकांची लाइन लागायची. पुढे लोक जेव्हा मला 'तुम्ही जीवनात कळावेदना जिरवायला कुठे शिकलात?' असा प्रश्न करतात, तेव्हा मला माझ्या बालपणीच्या त्या चाळी आठवतात. त्याच नगरीचा मी पुढे कलेक्टर झालो.

२६/११च्या वेळी मी मुंबई उपनगर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी होतो. मुंबईच्या अंडरवर्ल्डमधल्या अनेक घटना मला हुतात्मा विजय साळसकर यांनी सांगितल्या होत्या. त्यातून 'लस्ट फॉर मुंबई' ही माझी सर्वांत आवडती कादंबरी जन्म पावली; पण मी आजही एकाच प्रश्नाने हैराण आहे, कुठे गेली ती सुमारे

दहा लाख कुटुंबं? कधी पडला आहे तो प्रश्न, या भूमीतल्या इतिहासकारांना किंवा समाज-अभ्यासकांना?

काळ मोठा कठीण आला आहे. तो गिरणगाव, जिथे माझ्या खेडेगावातल्या प्रत्येक घरातला एक मजूर काम करत होता, जिथे आमच्या पाच-पाच पिढ्यांनी घाम गाळला, रासायनिक द्रव्यं शोषून जीवन संपवलं, त्या ठिकाणी आता ५०-५० मजली टॉवर्स उभे आहेत. साठ-साठ कोटींचे फ्लॅट विकले जातात. प्रत्येक फ्लॅटमध्ये, प्रत्येक मजल्यावर सुंदर स्विमिंग पूल्स आहेत; पण अंगावरच्या फाटक्या वस्त्रानिशी ज्या गिरणी कामगारांना आपला गिरणगाव सोडावा लागला, त्यांना आज तीस-पस्तीस वर्षांनंतरसुद्धा वचन दिलेली हक्काची घरं मिळालेली नाहीत. ही सारी श्रमिकांची करुण व वादळी गाथा मी माझ्या 'लस्ट फॉर मुंबई' या कादंबरीमध्ये लिहिलेली आहे.

आज आम्ही वि.वा.शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस हा 'मराठी भाषादिन' म्हणून साजरा करतो; पण त्याच वेळी याच शिरवाडकरांनी 'मंत्रालयाच्या दारासमोर चिंध्या पांघरून माय मराठी उभी आहे,' अशी खंत बोलून दाखवली होती. आपल्या स्वातंत्र्याला अर्धशतक लोटल्यावर स्वातंत्र्य देवीची विनवणी करणारा एक फटका त्यांनी लिहिला होता... ज्याचं पोस्टर बनवून तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी सर्व सरकारी कार्यालयांच्या भिंतीवर डकवण्याचं धाडस दाखवलं होतं. काय होते त्या महाकवीचे शब्द?

*पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करू नका*
*मीच विनविते हात जोडूनी वाट वाकडी करू नका*
*पर भाषेतही व्हा पारंगत ज्ञानसाधना करा, तरी*
*माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका*

मला वाटते तात्यासाहेबांनी परक्या भाषेचे पाय दाबण्याची ही कल्पना ज्या महापालिकांनी 'हुरळली मेंढी लागली इंग्रजी लांडग्यांच्या पाठी' अशी वृत्ती जोपासली आहे, त्यांच्यासाठीच खास लिहिल्या असाव्यात.

*करा कायदे परंतु हटवा जहर जातीचे मनातूनी*
*एकपणाच्या मारूनी बाता ऐन घडीला चळू नका*
*जन सेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा*
*मेजाखालुनी मेजावरतूनी द्रव्य कुणाचे लुटू नका*
*लाख लाख जण मेले माझ्यासाठी हे विसरू नका*

*मीच विनविते हात जोडूनी वाट वाकडी करू नका*

सातारची ही भूमी महाराष्ट्राला आणि देशाला नव्या प्रागतिक विचाराच्या उंच शिखरावर घेऊन जाणाऱ्या यशवंतराव चव्हाणांची आहे, असं आम्ही समजतो. डॉ.आंबेडकर आणि आचार्य अत्रे यांच्यानंतर यशवंतरावांच्या तोडीचा ग्रंथप्रेमी या भूमीमध्ये झाला नाही. चव्हाणसाहेबांनी स्वतः लक्ष घालून इथे ग्रंथालयांच्या चळवळीला विलक्षण गती दिली होती; पण गेल्या तीस-पस्तीस वर्षांपासून आजपर्यंत ग्रंथ आणि ग्रंथालयं या दोन्ही गोष्टींकडे आम्ही इतकं अक्षम्य दुर्लक्ष करीत आहोत की, त्या चळवळीला अखेरची घरघर लागली आहे. आजकाल ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या एक हजारपेक्षा कमी असेल, तिथल्या ग्रंथपालांचं पद आपण काढून टाकतो; पण मुळात एक हजार विद्यार्थिसंख्या असणाऱ्या शाळा प्रत्येक तालुक्यात फक्त चार ते पाच टक्के आहेत. म्हणजे, बाकीच्या सर्व शाळांत पाच-पाच दहा-दहा हजार ग्रंथांची संख्या असताना सरळ त्या ग्रंथालयांना कुलूप लावायचं, यालाच का म्हणायची आपल्या वाचन-संस्कृतीची वाढ? का याला समजायचं आम्ही अभिजात भाषेचं स्वागत? नवी ग्रंथखरेदी पूर्णपणे थंडावली आहे. पूर्वीच्या काळात शासन उत्तम ग्रंथनिर्मितीसाठी स्वस्त कागद पुरवायचे. तसला प्रकार आजकाल नाहीच; उलट नव्याने ग्रंथालयं चालू करण्यासाठी प्रेरणा वैगेरे द्यायचं सोडूनच द्या. ग्रंथालयांचे नवे प्रस्ताव पूर्णतः बंद करण्याचे फतवे आम्ही आधीच काढले आहेत.

१३ कोटींच्या या समृद्ध ऐतिहासिक महाराष्ट्रामध्ये मराठी ललित पुस्तकांच्या विक्रीची किती दुकानं आहेत? फक्त पस्तीस! या वेळी दारूची दुकानं राज्यभर किती आहेत, हा प्रश्न आम्ही विचारत नाही. महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. त्यांपैकी २० जिल्ह्यांच्या मुख्यालयामध्ये मराठी पुस्तक-विक्रीचे दुकानच नाही. दोन कोटींच्या वर मुंबई महानगराची लोकसंख्या आहे. ज्यामध्ये मराठी पुस्तक विक्रीची दुकानं फक्त पाच आहेत. तीही जुन्या मुंबई शहरात. दादरच्या पुढे मुंबईत मराठी पुस्तक विक्रीचे एकही दुकान नाही. कुठे चालली आहे आमची अभिजात मराठी भाषा? धन्य-धन्य ते ज्ञानोबा-तुकोबा!

'साहित्य संमेलनाचा अध्यक्ष' म्हणून मी ज्या जिल्ह्यांच्या मुख्यालयात ग्रंथविक्रीची दुकानं नाहीत, तिथे जाऊन मराठी भाषक आणि ग्रंथप्रेमी मंडळींच्या सहकार्याने त्या-त्या भागात अशी विक्री व्हावी म्हणून मी स्वतः प्रयत्न करणार आहे; पण मी मुख्यमंत्री महोदयांकडे फक्त दोन छोट्या मागण्या करणार आहे.

या राज्यातील सर्व एस.टी.बसस्थानकांवरील आणि रेल्वेस्थानकांवरील वृत्तपत्र आणि पुस्तक-विक्री दुकानांची भाडी मुद्दाम डोंगरासारखी वाढवली गेली. मग मिठाईवाले आणि इतर विक्रेत्यांना चढा भाव घेऊन दुकाने देण्याची व्यवस्था झाली. तरी कृपया विशेष लक्ष घालून ही दुकाने मायमराठीसाठी पुन्हा सुरू करण्यात यावी.

तसेच, राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या व तहसीलदारांच्या कार्यालयासमोर अगदी माफक दरात पुस्तक-विक्रीच्या दुकानांना परवानगी देण्यात यावी... जिथे खासगी प्रकाशकांबरोबर शासनाची प्रकाशनं आणि साहित्य संस्कृती मंडळ व भाषा विभागाने प्रकाशित केलेले ग्रंथ अग्रहक्काने ठेवण्याची सोय होईल. वाचकांचाही फायदा आणि माय मराठीचीही चांगली सेवा घडेल. मी आज नव्हे; तर चार वर्षांपूर्वी नाशिकच्या साहित्य संमेलनाचा उद्‌घाटक म्हणून असा महत्त्वाचा मुद्दा मांडला होता की, 'इथे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना पुरेसं वेतन मिळायला हवं. जिथे एका बाजूला नगरपरिषदांमध्ये आणि महापालिकांमध्ये पाचशे किंवा हजार सफाई कामगारांनासुद्धा उत्तम असं वेतन आपण देतो. का तर ते संपूर्ण नगराची सफाई करतात. त्याच गावातील पाच किंवा दहा ग्रंथालयीन कर्मचारी, जे तुमच्या मनाची मशागत करतात, त्यांना आम्ही काय देतो?'

एकीकडे आमच्या महाराष्ट्राची प्रगती ही सुपरसॉनिक वेगाने चालली आहे हेही मान्य करावं लागेल. नागपूर ते मुंबई या समृद्धी महामार्गाची कल्पना जेव्हा प्रथम मांडली गेली होती, तेव्हा मलासुद्धा ही कपोलकल्पित गोष्ट वाटली होती. अलीकडे मी या मार्गावर तीन ते चार वेळा प्रवास केला. तेव्हा झालेलं काम आणि त्या कामाचा प्रचंड आवाका बघून मी हादरून गेलो. संभाजीनगरच्या पुढे अल्याडच्या डोंगरापासून पल्याडच्या डोंगरापर्यंत थेट सरळ रेषेत जाणारा तो प्रचंड रस्ता म्हणजे, एखाद्या विश्वकर्म्याने रचलेली झुलत्या पाळण्याची अजब किमया वाटावी तशी ती निर्मिती आहे. हे अचाट स्वप्न पाहणाऱ्या आणि प्रत्यक्षात राबवणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यापासून ते सर्व इंजिनिअर आणि मजुरांपर्यंत मी सर्वांचे त्रिवार अभिनंदन करतो.

अलीकडे, शिवरायांच्या आग्रा मोहिमेवर 'अस्मानभरारी' नावाची कादंबरी लिहिताना मी आग्र्यापर्यंत शिवरायांनी वापरेलला जुना रस्ता आणि आजचा गडकरी युगातील नवा सहा पदरी रस्ता, चांगला तीन-चार वेळा पुनःपुन्हा

प्रत्यक्ष मोटारीने निरखून पाहिला आहे. अर्थात, अशा रस्त्यांच्या आणि वाटेतल्या नद्यांवरच्या पुलांना पर्वतासारखा पैसा लागतो. हजारो कोट्यवधी रुपये लागतात; पण आमच्या 'साहित्य आणि संस्कृती' या विषयावर खर्च करण्यासाठी किती धनाची आवश्यकता असते?

माझी खात्री आहे की, एखाद्या मोठ्या नदीवरच्या एका मोठ्या पुलाचा खर्च म्हणजे, साहित्य संस्कृतीच्या पन्नास ते साठ वर्षांच्या बजेटपेक्षा नक्कीच अधिक असतो; पण दुसरीकडे साहित्य संस्कृतीचा आमच्या जीवनातील जो अदृश्य पूल, तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रवास करतो. त्यातून मिळणारे ज्ञान, दृष्टी, दृष्टिकोन आणि भविष्यकालीन विचार हे तुम्हांला पैशामध्ये मोजता येणार नाहीत. म्हणूनच, जेव्हा एखादा वरिष्ठ ग्रंथालयाची फाइल समोर येताच 'पुस्तक वाचून कोण शहाणं झालं आहे का?' असे उर्मट उद्गार काढतो, तेव्हा तो कर्मचाऱ्यांचाच नव्हे; तर मायमराठीला मोठेपण देणाऱ्या या भूमीतल्या साधुसंतांचा अपमान ठरतो.

आज एकीकडे आम्ही 'अभिजात भाषा' म्हणत स्वतःच्याच कौतुकाचे ढोल वाजवत फिरत आहोत; पण आम्हा सर्वांचेच वर्तन मायमराठीच्या विकासासाठी तारक नव्हे; तर मारक असल्याचे, मी नव्हे; तर आमचे नियम, अधिनियम आणि कागदपत्रं सांगतात. केंद्र आणि राज्य शासनाने लेखक आणि प्रकाशक यांच्यावर जो १८ टक्के जी.एस.टी लावला आहे, तो तत्काळ रद्द करावा; कारण मुळात प्रकाशन व्यवसायच आतबट्ट्यातला आहे.

शासन नव्हे; तर समाजानेसुद्धा ग्रंथ आणि संस्कृतीकडे मोठ्या मनाने पाहायला शिकले पाहिजे. अनेकदा आपल्या कुटुंबातले चार सदस्य मल्टिप्लेक्समध्ये जातात. चारशे रुपयांचे प्रत्येकी एक प्रमाणे पॉपकॉर्न खुशीने खातात आणि ते खाता-खाता मराठी पुस्तकांच्या किमती खूप भडकल्या असून, ३०० रुपयांच्या खाली पुस्तक मिळत नाही, असा गंभीर मुद्रेने विचार करतात. आज घराघरांमध्ये आमच्या देव्हाऱ्याचा विस्तार वाढला आहे; पण अनावश्यक धोंड म्हणून घराघरातली व्यक्तिगत छोटी ग्रंथालयं नष्ट झाली आहेत. मराठी भाषेमध्ये जी थोडीफार पुस्तकं खपत असतील, त्यांनासुद्धा आज पायरसीच्या वाळवीने हैराण करून सोडलं आहे.

२०१२पासून राज्यातल्या मराठी शाळेच्या कोणत्याही नव्या तुकडीला शासकीय अनुदान मिळत नाही. म्हणजेच, गेल्या १३ वर्षांत एकही नवी मराठी

शाळा सुरू झालेली नाही. २०२५मध्ये एका आकडेवारीनुसार, एका वर्षात ६५ नव्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मंजुरी मिळालेली आहे. एकट्या मुंबईत या कालावधीत १०६ मराठी शाळा बंद करण्याचा पराक्रम आम्ही घडवून आणला आहे. बाहेरगावी काय घडलं असेल, याची पुरी माहिती नाही.

इंग्रजीसारख्या भाषेला कैवारी कमी आहेत म्हणून की काय, मुंबई आणि नागपूरसारख्या महापालिकांनी स्वतःच्या इंग्रजी शाळा सुरू करण्याचा आचरट उद्योग आरंभला आहे. ज्या मराठी शाळांमध्ये २०पेक्षा कमी पटसंख्या असेल, तर ती शाळा बंद करून तिथली शाळा जवळच्या दुसऱ्या शाळेत हलवायची आणि ह्या साऱ्या डांबरट उद्योगाला 'सक्षमीकरण' असं गोंडस नाव द्यायचं. वास्तवात हे सक्षमीकरण आम्ही मराठी शाळांचं करतोय की, इन्टरनॅशनल स्कूलवाल्यांचं, हाच खरा प्रश्न आहे.

याआधी या देशातील तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळी आणि उडिया या सहा भाषांना आमच्याआधी अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. त्यांनी आपापल्या भाषेचा देव्हाऱ्यांसारखा गौरव चालवला आहे. त्या-त्या भाषेचे प्रेमी आणि अभिमानी इतके जागृत आहेत की, तिकडे त्यांच्या मातृभाषेतील शाळांच्या तुकड्या बंद करण्याचा आवाजसुद्धा काढायची कोणामध्ये धमक नाही. उलट, आमच्याकडे गेल्या दहा वर्षांतच नव्हे; तर गेल्या ३५ वर्षांपासून शासन आणि प्रशासन हेच माय मराठीचे खऱ्या अर्थी 'घरचे मारेकरी' ठरले आहेत. चिंध्या पांघरलेल्या स्थितीत आम्ही मराठी भाषेलाच नव्हे; तर खुद्द तात्यासाहेब शिरवाडकरांना गलितगात्र स्थितीत मंत्रालयासमोर उभं केलं आहे.

मी जेव्हा सातवीच्या वर्गात होतो, तेव्हा पट पाच विद्यार्थ्यांचा होता. आजच्यासारखे हे पट संख्येचे जाचक नियम असते, तर आमची शाळाच झाली नसती. वीस वैगेरे सोडा, वर्गात एखादा दुसरा विद्यार्थी असला, तरी मराठी शाळा चालायलाच हवी; कारण कोणी सांगावे मराठी शिकणारा तो एक विद्यार्थी उद्याचा ज्ञानेश्वर होईल किंवा दुसरा तुकोबाही असेल.

साहेब, मराठी शाळांचा आणि शिक्षणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आपण एकच जादूची कांडी फिरवावी. सर्व नगरपालिका आणि महापालिका अगर ग्रामपंचायत क्षेत्रात असणाऱ्या मराठी शाळा, ती शाळा बंद पडली असली तरी, त्यांच्या इमारती किंवा आजूबाजूच्या मोकळ्या जागेसह तदंगभूत वस्तूंच्या

विक्रीस अजिबात परवानगी दिली जाऊ नये. या एका जादूनेच अवघा चमत्कार घडेल. शिवरायांनी  मुंबईवर ताबा मिळवण्यासाठी मुंबईजवळच्या खांदेरी आणि उंदेरी या बेटांवर हल्ले चढवले होते. आमच्या छत्रपती संभाजीराजांनी तर 'केजविन' नावाच्या ब्रिटिश गव्हर्नरबरोबर १६८४ साली लेखीटाकी मुंबई खरेदी करायचा करारच केला होता. त्याची रक्कम ८० हजार पॅगोडा ठरवली गेली होती.

या महानगरीचे मूळ रहिवासी कोळी, भंडारी, पाचकळशी, आगरी आणि कुणबी. काय वर्णन करावं या मुंबईनगरीचं-

*मुंबईत उंचावर मलबार हिल इंद्रपुरी*
*कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती*
*परळात रहाणारे रात्रंदिन राबणारं*
*टांग्याची घोडी मेली रस्त्यावरती*

मुंबईमध्ये धंदा करण्यासाठी येणारा पहिला गुजराती व्यापारी म्हणजे, भीमजी पारेख. हा ईस्ट इंडिया कंपनीच्या मदतीने १६५०च्या दरम्यान इथे आला होता. १८५६ साली मुंबईमध्ये कर्सनदास पटेल या व्यापाऱ्याने कापडाची पहिली गिरणी बांधली.

आता दादरमध्ये मराठी माणसांची संख्या अगदीच नावाला उरली आहे.

मुंबईच्या गिरणगावातील आणि गिरगावातील आमची ती मूळ माणसं, या धरतीची लेकरं गेली कुठे? आणि हे अतिश्रीमंतांचं आक्रमण आमच्या छाताडावर आलं कधी, हे आम्हाला उमगलंच नाही.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला मुंबई आणि मराठी भाषा ही किती त्यागातून आणि त्रासातून मिळाली आहे, हे जाणून घ्या. इथल्या जनतेला मराठी भाषकांचं राज्य मिळू द्यायचं नाही आणि मुंबईही मिळू द्यायची नाही, अशी कणखर भूमिका दुसऱ्या-तिसऱ्या कोणी नव्हे; तर सरदार वल्लभाई पटेल यांनी घेतली होती, याचे अनेक घसघशीत पुरावे इतिहासात आहेत.

२१ नोव्हेंबर, १९५५ या दिवशी मुंबईच्या त्या वेळच्या असेम्ब्लीमध्ये 'त्रिराज्य योजने'चा म्हणजेच महाराष्ट्राची; मुंबई, महाराष्ट्र आणि गुजरात अशी या राज्याची तीन शकलं करायचा ठराव मांडला जाणार होता. त्यामुळे मुंबईच्या चाळीचाळींतून 'महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा' म्हणत मुख्यतः गिरणी कामगार, पांढरपेशे अशा सर्वांचा चार लाखांचा भव्य मोर्चा निघाला होता. त्याचं  नेतृत्व

सेनापती बापट यांनी केलं होतं.

*चकाकली संगीन अन्यायाची,*
*फौज उठली कामगारांची, शेतकऱ्यांची, मध्यमवर्गीयांची*
*उठला मराठी देश, आला मैदानी त्वेष, वैरी करण्या नामशेष*
*गोळी डमडमची छातीवर साहिली,*
*माझ्या जिवाची होतीया काहिली.*

त्या दिवशी मोरारजींच्या पोलिसांनी १०६ हुतात्म्यांच्या अंगात डमडमच्या गोळ्या घातल्या. डमडमची गोळी म्हणजे, जी अंगात घुसताना पहिली जखम करते. आणि पुन्हा मांसात गेल्यावर दुसऱ्यांदा ब्लास्ट होऊन चिंधड्या उडवते. त्या आंदोलनात मराठीसाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या जिवाची कुर्बानी दिली होती. पण मित्रांनो, मराठी माणूस आणि मुंबईचं महत्त्व आमच्या अण्णा भाऊंनीच एक वाक्यात सांगून टाकलंय,

'अरं वाघाला नखं आणि गरुडाला पंख तशी मुंबई मराठी माणसांची'

'९९व्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष' म्हणून या नात्याने मी भीती नव्हे; तर वस्तुस्थिती सांगतो आहे.

संयुक्त महाराष्ट्रात आम्ही मुंबई मिळवली, तेव्हा आमची संख्या ५०-५२ टक्के होती. २००१च्या जनगणनेनुसार, ती आता ३० टक्क्यांवर आली. नंतर २०११च्या आकड्यानुसार साधारण ती संख्या ३५ टक्के झाली. आतातर ती त्याहून खूप खाली नीचांकावर जाऊन पोहोचली आहे. गिरगाव, दादर, पार्ला सारं खाली होत आहे. आम्हा सर्वांच्या डोक्यावरून पुनर्वसन आणि स्थलांतराचा वरवंटा फिरतो आहे; पण मलबार हिल इंद्रपुरी नावाच्या जागेच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव कधी परमेश्वरालासुद्धा स्वप्नात बघायला मिळणार नाही. जेव्हा या भूमीतले हत्ती आणि नवसाचे गणपतीसुद्धा आमचे राहिले नाहीत, त्यांना पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही आता कोणत्या देवाकडे नवस बोलायचा? माझा इंग्रजी किंवा हिंदी भाषेला मुळीच विरोध नाही. आईच्या दुधावर वाढलेलं बालक जसं बलवान असतं, तसंच तिच्या मुखातल्या शब्दावर ते अधिक बलवान बनतं. लक्षात ठेवा- आईच्या शब्दसंस्कारांत वाढलेलं जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या शाळेत वाढलेलं मूल तुमची जन्मभर श्रावणबाळासारखी काळजी घेईल, ते तुम्हाला कधीही वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणार नाही. गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रातील जे शास्त्रज्ञ आंतराष्ट्रीय स्तरावर गाजले, त्यांपैकी

९८ टक्के शास्त्रज्ञ हे मराठीतूनच शिकले होते. गेल्या वर्षी मला फ्रँकफर्टच्या ‘आंतराष्ट्रीय पुस्तक महोत्सवा’ला केंद्र सरकारने जर्मनीला पाठवलं होतं. तेव्हा काही शाळांना मी भेट दिली. जर्मनीसारख्या महाप्रगत राष्ट्रातसुद्धा प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना सक्तीने त्यांच्या मातृभाषेतच दिलं जातं.

महात्मा फुल्यांनी हंटर साहेबांसमोर ‘या देशातलं शिक्षण आमच्याच भाषेत मिळावं,’ असा आग्रह धरला होता. बॅरिस्टर सावरकर हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असताना त्यांनी ‘प्राथमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण मातृभाषेतूनच मिळायला हवं’ असा ठराव केला होता. महात्मा गांधींनीही मृत्यूच्या पाच दिवस आधी ‘या देशातील लोकांची प्रगती ही फक्त मातृभाषेच्या माध्यमातून होऊ शकते’ असं सांगितलं होतं. यापेक्षा कोणाची अधिक प्रमाणपत्रं हवीत?

एकूणच, मायमराठीच्या अस्तित्वाची लढाई आता आपल्या प्रत्येकाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली आहे.

उद्या तुमच्या देव्हाऱ्यावर विठोबासमवेत ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या प्रतिमा टिकाव्यात असं वाटत असेल, तर वेळीच झोपेतून जागे व्हा.

तुमच्या खांद्यावर झेंडा कोणत्याही जातीचा, पक्षाचा वा धर्माचा असू दे. त्याचा दांडा हा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे, तिचा गोंडा मराठीच असायला हवा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पाळणा हलवताना त्यांच्या मातोश्री भीमाबाईंच्या मुखातून, तसंच महात्मा फुले यांच्या पाळण्याची दोरी ओढताना त्यांच्या माता चिमणाबाईंच्या ओठांतून आणि बाळ शिवरायांना जोजवतना जिजाऊसाहेबांच्या कंठातून बाहेर पडलेल्या महन्मंगल ओव्या फक्त मराठी भाषेतच होत्या, या गोष्टीचा अजिबात विसर पडू देऊ नका.

लवकरात लवकर जागे व्हा.

अन्यथा असेच गुंगीत राहाल, तर कायमचे संपून जाल.

भाषा मराठी हीच असावी आमच्या ललाटी!


म्हणून बाप होऽऽ, साताऱ्याची ही पवित्र भूमी सोडताना एक पवित्र शपथ घेऊ या-

*आमची माय मराठी वाचवू या.*

*फक्त ज्ञानोबा आणि तुकोबाच्या पालख्या नाचवू या!*

♦

# पुस्तकाच्या पानांतून




## महासम्राट

खंड तिसरा

**अस्मानभरारी**

**विश्वास पाटील**

पृष्ठे : ४९२
किंमत : ७५०

*शिवरायांची लक्षवेधी जीवनगाथा असलेल्या महासम्राट कादंबरी मालिकेतील तिसरे पुष्प 'अस्मानभरारी'*

## विस्तवाची राळ

त्या अत्यंत अपमानकारक प्रसंगाने शिवराय प्रक्षुब्ध बनले होते. ते कोणाचं काही ऐकायला तयार नव्हते. त्या सामर्थ्यशाली दरबारातून राजांचं असं वावटळीसारखं बाहेर निघून जाणं कोणालाच अपेक्षित नव्हतं. नव्हे; तसं त्या बादशाही दरबारात आगपाखड करायचं धाडस कोणा राजामहाराजाकडून कधीही घडलं नव्हतं. बादशहाची लालेलाल बुबुळं रामसिंगकडे पाहत गरगर फिरत होती.

धन्याच्या नजरेतला तो विखार बघून रामसिंग जागीच सटपटला. धावत तसाच औरंगजेबाच्या त्या उंच सिंहासनाशेजारी जाऊन पोचला. पुढे किंचितसा झुकला. प्रचंड संतापलेल्या औरंगजेबाने रामसिंगाकडे अत्यंत वक्र नजरेने बघत विचारलं, ''सिवाला काय झालं आहे? वह इतना परेशान क्यूँ?''

''माझीही बुद्धी आता मला काम देईनाशी झाली आहे मेरे आका!''

''जाओ! फौरन उसे रोक लो, समझाओ उसे और वापस बुला लाओ!''

दीवान-ए- आमच्या छताबाहेरच्या खांबाजवळ कोपऱ्यात शिवराय उभे होते. त्यांचं अंग रागाने कापत होतं. आपल्या तोंडाजवळ हाताची बोटं धरत राजांनी 'बिलकुल नका बोलू' असा इशारा रामसिंगला केला. तोवर बादशहाने अकीलखान आणि मुखलीसखान या आणखी दोघा अंमलदारांना तिकडे धाडलं, ''हवं तर त्यांना खिलतीचा मानपानाचा पोशाख द्या. त्यांची समजूत घालून त्यांना वापिस घेऊन या!'' असं सांगितलं होतं.

ते तिघे जण शिवरायांची मनधरणी करत होते, ''राजाजीऽऽ आप किरपा करके वापिस चलिये।''

''चलिये, हमारे आका आपका इंतजार कर रहे हैं। खिलतीची मखमली वस्त्रं आपल्यासाठी तिकडे तयार आहेत.'' अकीलखान राजांना विनवणी करत बोलला.

''खामोशऽऽ, कोण पुसतो तुमच्या त्या मौल्यवान वस्त्रांना? करा चोळामोळा तुमच्या त्या महागड्या वस्त्रांचा अन् द्या फेकून तिकडे कोनाड्यात!''

''लेकिन राजन...?''

''कशी, कशी लाजशरम वाटत नाही हो तुम्हांला?''

''राजे हळूऽऽ''

''काय हळू? त्या जशवंतसिंगाच्या रांगेला आम्हांला खडे करून आमची मानखंडना करता? ज्याच्या पाठीवर आमच्या बहादूर मावळ्यांनी तलवारीच्या टोकाने नक्षी काढली होती–त्या पळपुट्याच्या पाठीमागच्या रांगेत तुम्ही आम्हांला खडे करता?''

''सबुरीनं घ्या राजे, सबुरीनं घ्या. हा इतका प्रकोप चांगला नव्हे.'' रामसिंग उद्गारला.

''कसली सबुरी? धिक्कारतो आम्ही ही लाचारी, अन् गुलामगिरी!''

''पण राजे, थोडं शांततेनं...''

''कशासाठी इतक्या दूर दक्षिणेतून आम्हांला बोलवता? कशाला? तुमच्या या बादशहाचं खप्पड तोंड बघायला? ज्या सिंहासनाधिष्ठित गृहस्थाला आपल्या मेहमानांचा आदर राखणं साधं ठाऊक नसावं?''

''तसं नाही, पण राजे...'' अकीलखान चाचरत म्हणाला.

''किती नाटकी तुमचा हा बादशहा? वाटेत आम्हांला जागोजाग ती भावनेनं ओथंबलेली पत्रं काय पाठवतात! कुठवर आलात? कसे आहात? अरे, अशा उतावळ्या प्रतीक्षेचं खोटारडं ढोंग किती रचाल?''

''ऐका राजन, ऐकाऽऽ आम्हांला आमच्या चुका मान्य; पण तुमचा हा शीघ्रकोप- तोही कर्तुमकर्तुम अशा शहेनशहाच्या दरबारात कसा चालणार? थोडे भानावर या.'' रामसिंग म्हणाला. ''मी आपलं दु:ख महसूस करू शकतो राजन, मगर हुकूमत के आगे अकल नहीं चलती, त्याला कोण काय करणार?''

दरबारातल्या त्या अपमानांच्या मालिकेनं राजांच्या स्वाभिमानाला जबर इजा केली होती. आता तर राजांच्या डोळ्यांतून एकीकडे ठिणग्या उडत होत्या. त्याच वेळी गालांवर गरम अश्रू ओघळू लागले होते.

आता मात्र राजांच्या लालेलाल चर्येवरच्या साऱ्या रेषा, गळ्याजवळच्या शिरा ताणल्या गेल्या. नव्हे; संतापाने फुलून आल्या. त्यांच्या मुखावर जसं काही सागराच्या खवळत्या लाटांचं नर्तनच सुरू झालं. ते गरजले,

''हे पाहा! सांगा तुमच्या अत्यंत मग्रूर, बेरहम दिल्लीपतीला... म्हणावं, हवं तर माझा मुडदा पाडा. गळा घोटा. किंवा तुम्हांस हवं तर आम्हाला खुशाल बंदिखान्याच्या काळ्याकुट्ट अंधारात कायमचं ढकलून द्या. पर्वा नाही; पण आम्हांला नकोत तुमची ही अशी भयंकर आभूषणं, दिखाऊ, नाटकी सन्मान! यापुढे तुमच्या त्या दरबाराकडे ढुंकून पाहणंही नको— ''

राजे तीरासारखे बाहेर पडले. तेव्हा मघापासून श्वास रोखून भयचकित मनाने जागीच थरथरणाऱ्या दरबाऱ्यांना थोडं हायसं वाटलं. त्यांची कुजबुज वाढली,

''काय भयंकर आहे सिवा! काय रे रामसिंग, तुझ्या मेहमानाला साधा अटकाव करणं तुला जमलं नाही का?''

''मी तरी काय करू खानसाहेब? हे पडले दोघे श्रेष्ठ ताकदवर पुरुष. जशा दोन लखलखत्या समशेरी म्यानांतून बाहेर पाडाव्यात, त्या एकमेकीवर घासून ठिणग्यांचा पाऊस पडावा, तशीच या दोघांतली ती शाब्दिक चकमक सुरू

होती. मी फक्त बघ्याची भूमिका निभावत राहिलो.''

''कितना हिंमतवाला, दंगेखोर आणि कोपिष्ट हा इन्सान?''

''आलमगीर साहेबांचा त्यांच्याच दरबारात उभं राहून असा उघड अपमान करणारा हा बागी मनुष्य. त्याच्या रंगढंगाकडे जहाँपन्हा दुर्लक्ष करतातच तरी कसे?''

तेवढ्यात एक जण खवचट हास्याचा सूर लावत बोलला, ''बऱ्याच दिवसांत आमच्या आग्रा किल्ल्याच्या दारात हत्तीच्या पायाखाली कोणाचं मुडकं चेचायचा प्रसंग घडलेला नाही.''

''खरंय, पातशहा सलामतनी सिवाच्या मस्तकाचा नारळ जरूर फोडावा. हत्तीच्या पायांना आजच तो मौका द्यायला हवा.''

''बिलकुल सही. बहुत जंगली आदमी हैं यह सिवा...''

दरबार उरकून पलीकडच्या महालात बादशहा निघाला. आज त्या शाही सोहळ्याच्या निमित्ताने बादशहाचा हत्ती सोन्यारुप्याने मढवला गेला होता. अंबारीत चढण्यासाठी हत्तीच्या पाठीला टेकवलेल्या चांदीच्या शिडीजवळ औरंगजेब उभा राहिला. त्याला वाकून मुजरा करण्यासाठी समोर उडालेल्या सरदारांच्या आणि मानकऱ्यांच्या गर्दीकडे त्याने बघितलं. मुघल सल्तनतीमध्ये क्रूर म्हणून विख्यात असलेल्या आग्र्याच्या फौजदाराला, फौलादखानाला जवळ येण्याचा इशारा नजरेनेच बादशहाने केला. तो खानाला म्हणाला, ''फौलाद, अब तुम्हे सिवाके खिलाफ ठोस कदम उठाना पडेगा।''

''गुस्ताखी माफ मेरे आका!'' बादशहापुढे झुकत फौलादखान बोलला, ''जहाँपन्हा! पहिल्याच दिवशी सिवाला असं जेरबंद करणं ठीक दिसणार नाही... त्यात आजचा दिवस मोठा मुबारक आहे! तुमची सालगिरह!''

''लगेच त्यांना अंधारकोठडीत फेकून द्या असा हुक्म मी देत नाही; पण थोड्या दूरी से होईना पण कळेल न कळेल अशा ठिकाणी सिवाच्या हवेलीभोवती चौक्यापहारे बसवा.''

''जी हुजूर!''

''और एक बात कभी न भूल जाना-''

''जी जहाँपन्हा?''

''यह कोई साधारण राजबंदी नहीं। खतरनाक सिवा हैं। मालूम नहीं क्यूँ,

लेकिन आज का दिन मुझे अपनी जिंदगी के बुरे दौर की शुरुवात लगती है!''

त्या आठवड्यात बाजारगप उठली होती, सुजा अजून जिंदा असून तो आरकान सोडून अफगाणिस्तानाकडे फरार झाला आहे. औरंगजेबाच्या बेचैनीसाठी ती खबर पुरेशी होती.

संध्याकाळ झाली. आग्रा नगरीच्या गलीमोहल्ल्यामध्ये अंधार उतरला. रामसिंगला तूर्त हवेलीच्या पलीकडे राजांसाठी एक तात्पुरता शाही तंबू उभा करण्याचा हुकूम झाला होता; परंतु ती आजूबाजूची जागा खूप मोठी आणि विस्तीर्ण होती. त्यातच दोन रात्रींमागे मोठा वादळी पाऊस पडून गेला होता. त्यामुळे त्या मैदानात पाणी साचून बऱ्यापैकी चिखल झाला होता. त्याच्या एका कोरड्या बाजूला दिवसभर मोठा डेरेदार तंबू उभारण्याचं काम सुरू होतं. त्यासाठी रामसिंगचे सेवक त्रिकालदास, गोपीराम वैगेरेंची धावपळ सुरू होती. एकीकडे रात्री हस्त चौकीचं रामसिंगचं रखवालीचं काम आणि इकडे तंबू उभारणी, या दोन्हीमध्ये त्याची चांगलीच त्रेधातिरपीट उडाली होती. मनासारखा तंबू उभारला गेला नव्हता. त्यातच तोंडाशी येऊ घातलेला पाऊसकाळ. वर शिवाजीराजांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीचं संरक्षण! ह्या साऱ्या समस्या होत्याच. त्यामुळे रामसिंगचा गोंधळ उडाला होता.

राजांच्या भेटीला रामसिंगचा सेवक गोपीराम आला. त्याने आपल्यासोबत फळांची एक सुबक करंडी राजांना नजर केली. राजे त्या तंबूमध्ये विश्रांती घेत होते. आताशी कुठे त्यांच्या मस्तकातल्या त्या संतापाच्या लाटा बऱ्याच खाली बसल्या होत्या.

राजे विचार करत होते - संयमाशिवाय शहाणपण नाही. असे अनेक मानापमान आपल्याही घराण्याच्या वाट्याला आले होतेच. जिजाऊसाहेब राजांच्या बालपणी अनेकदा ऐकवायच्या, ''बाळराजेऽऽ तो तंजावर ते विजापूरपर्यंतचा किती दूरचा उन्हातान्हातला रखरखीत प्रवास. जवळपास महिनाभर त्या वाटेवरचा फुफाटा तुमचे पिता शहाजीराजे तुडवत होते. आपल्या वादीदुश्मनांनी त्यांची किती ती दयनीय अवस्था करून ठेवली होती. हत्तीच्या तांड्यासोबत रखरखत्या उन्हातली ती जळती वाट रोज तुमचे आबा चालायचे. एखाद्या मामुली गुन्हेगारासारखी! पण, शेवटी आपलं मूळ दैवत भगवान शंकर! आपल्या देवाप्रमाणेच अनेकदा जहर पिऊन मुकाट दिवस काढायचा वखत तुमच्या

पिताजींवर ओढवला होता; मात्र त्या अत्यंत हिंमतबाज पुरुषाने भयसंकटाच्या काळोखातसुद्धा आपल्या जीवनामध्ये हार कधीच मानली नाही.''

माता-पित्यांच्या त्या ओल्या आठवणी जागल्या, तसा राजांचा दुपारचा राग बराचसा निवला होता. गोपीरामने राजांना काही मोहरा आणि अलंकारही भेटीदाखल नजर केले. अंधार पडल्यावर रामसिंगाकडून बल्लुशहा आणि गिरिधारीलाल मुन्शी राजांच्या भेटीसाठी आले. थोड्या वेळाने सिद्दी फौलाद आणि प्रतीतरायसुद्धा राजांची ख्यालीखुशाली विचारण्याच्या निमित्ताने आले. मघापासून कुँवर रामसिंग याच्याकडून अनेक दूत येत होते; पण रामसिंगचं इकडे येण्याचं धार्ष्ट्य होत नाही, ही गोष्ट राजांच्या ध्यानी आली.

यमुनाकाठच्या त्या रातवाऱ्याने महाराजांचं मन थोडं प्रफुल्लित केलं होतं. तरी त्यांच्या अंतर्मनात खळबळ माजली होती. नकळत एक काटेरी वास्तव त्यांना आतून रक्तबंबाळ करून गेलं होतं. आग्र्यात येऊन बादशहाची भेट घेणं हा प्रसंग म्हणजे त्यांच्या वाट्याला आलेली एक खोल जखम बनली होती, जी सहजासहजी भरण्यासारखी नव्हती.

आपण मिर्झाराजांच्या गोड शिष्टाईला असो की भावनिक नाटकी पत्रांना असो; पण भुललो. कायमचे फसलो. अन् अखेर जुलमी बादशहाच्या मगरमिठीत अडकून पडलो हेच खरं. आता मात्र औरंगजेबाच्या सल्तनतीचं हे कडं भेदून इथून बाहेर निघून जाणं, ही गोष्ट केवळ अशक्य कोटीतली वाटत होती. तरीसुद्धा काय वाट्टेल ते झालं तरी, इथून दक्षिणेकडे भरारी घेणं आवश्यक होतं. स्वत:चं जीवित आणि हिंदवी स्वराज्याचं तारू टिकवणं अन्यथा अशक्य होतं!

शिवराय आजच जरी आग्रा दरबारात दाखल झाले होते, तरी दक्षिणेतून इकडे निघण्यापूर्वी मानसिकदृष्ट्या ते या परिसरामध्ये केव्हाचे येऊन राहिले होते.

ऐनवेळी दुपारपर्यंत म्हणावं असं तंबूचं काम मार्गी लागलं नाही. राजांची तर तत्काळ व्यवस्था करणं गरजेचं होतं. त्यामुळे रामसिंग आणि त्याच्या सेवकांमध्ये गडबडीने वाटाघाटी झाल्या. रामसिंगच्या बड्या हवेलीपासून सुमारे तेवीसशे पावलांवर एक मेहेमानखाना नावाची जुनी हवेली होती. ती फारशी वापरात नसायची; परंतु बाहेरून कोणी राजा-महाराजा मिर्झाच्या भेटीस आला, तर त्यांची व्यवस्था या खास हवेलीमध्ये केली जात असे. सर्व सोयींनी युक्त अशी ती वास्तू होती. त्यामुळेच बादशहाच्या कानावर घालण्याआधीच शिवरायांसाठी दुपारपासून ही हवेली सजवण्याची तयारी सुरू झाली होती.

शेवटी त्या हवेलीत शिवराय पोचले, तेव्हा बाहेर दाट अंधार झाला होता; मात्र हवेलीमध्ये मशाली, हिलाल, मातीच्या पसरट पणत्या, अशी अनेक चिरागदानांची व्यवस्था करण्यात आली होती. महाराज आपल्या शय्यागृहामध्ये पोचले. तोवर पाठोपाठ त्यांचे कारभारी निराजी रावजी तिथे दाखल झाले. त्यांनी राजांना सांगितलं, ''महाराज, मथुरेहून तीन ब्राह्मण आपल्या भेटीसाठी काल रात्रीच आग्रा शहरात दाखल झाले आहेत. आपला मुक्काम इथे हलणार हे समजल्यापासून बाहेरच्या बागेत ते आपली प्रतीक्षा करत बसले आहेत.''

''मथुरेहून? कोण बरं?''

''त्यांचं म्हणणं... आपले पेशवे मोरोपंतदादा यांचे ते तिघे सख्खे मेव्हणे...''

''हांऽऽ , हांऽऽ ... आत्ता आठवलं, ते त्रिमलबंधू असणार. त्यांना बाहेर न थांबवता तत्काळ आत आणण्याची व्यवस्था करा. त्यांना गूळपाणी द्या. ''

ते तिघे त्रिमलबंधू आत येताच महाराजांना बघून भारावून गेले. मूळची ही मंडळी महाराष्ट्र पठारावरची; परंतु आता मध्ये अनेक वर्षं गंगा-यमुनाकाठच्या तीर्थक्षेत्रांमध्ये सेवा करण्यात त्यांनी घालवली होती. ते तिघेही दिसायला चपळ, काटक आणि शिडशिडीत होते. आता आपोआपच देश तसा वेष या नात्याने त्यांच्या इकडच्या मुक्कामामध्ये परिवर्तन घडलं होतं. गंगा-यमुनेकडच्या पंड्यांमध्ये जी सतत धावपळ करण्याची वृत्ती आणि चपळपणा असतो, तो आता या तिघांच्याही अंगामध्ये काठोकाठ भरला होता. म्हणूनच ते पोरासोरांच्या उत्साहाने सारे व्यवहार पार पाडत होते.

''तुम्ही आमच्या मोरोपंतांचे इतके जवळचे नातलग म्हणजे घरचीच माणसं की हो.'' राजे बोलले.

''हां महाराजऽऽ, मोरोपंतांनी इकडे त्रिस्थळी यात्रेच्या निमित्ताने आलेल्या मंडळींकडून तुमच्या इकडच्या भेटीबाबत कल्पना देणारी खुलासेवार पत्रं आम्हाला पाठवली आहेत.''

''या मुलखात आम्ही अहोरात्र आपल्या सेवेमध्ये उभे आहोत याची खात्री बाळगा.''

''कोणतंही काम लागल्यास लगेच कळवा, मथुरा इथून फार दूर नाही.''

''हो ऽऽ,'' महाराज थोडे पडत्या आवाजात बोलले, ''आज बादशाही दरबारात थोडी गडबडच उडाली.''

‘‘होऽऽ आम्ही तिघेही त्या क्षणाचे साक्षीदार आहोत महाराज. आपण तिथे ढाण्या वाघासारखी जी डरकाळी फोडलीत, तशी हिंमत इकडे कोणात नाही,’’ केसोपंत म्हणाले.

राजांनी पुरेसा वेळ देऊन त्रिमलबंधूंची खुशाली आणि या आग्रा बरेली भागाची बरीचशी माहिती करून घेतली. त्या तिघांसोबत अजून काही मंडळी आली होती. त्या सर्वांना आत बोलावण्यात आलं. त्यातल्या एका शेलकाट्या आणि पिवळसर कांतीच्या मनुष्याचा परिचय करून देताना केसोपंत म्हणाले, ‘‘महाराज, हे आपले जांबुवंत कुंभार. यांचं घराणं पंढरपूरचं. यांचे आजोबा गयाक्षेत्री उत्तरेत आले होते. तेव्हापासून ही मंडळी इकडेच स्थायिक झाली.’’

‘‘महाराज, आमची ही तिसरी पिढी.’’ जांबुवंत बोलला.

‘‘इथे आग्र्यामध्ये कुठे राहता?’’

‘‘इथून जवळच जमनाकाठी एक कुंभारपुरा आहे. तिथे आमचं छोटंसं मकान आहे. तुमच्यासकट बाळराजांनासुद्धा काही लागलं, तर घरचे समजूनच हक्काने बोलवावं.’’

राजांनी हसून होकारार्थी मान डोलवली. तेवढ्यात एका उंच्यापुऱ्या, गुडघ्यापर्यंत लांब लोकरी अंगरखा घालून उभ्या असलेल्या मनुष्याचा परिचय करून देत केसोपंत म्हणाले, ‘‘हा आमचा पुष्पक सैन. हा न्हावी समाजाचा. पुण्याजवळच्या पिंपरी गावचा राहिवासी. दोन दशकांपूर्वी यात्रेनिमित्त इकडे आला. बरेलीच्या एका मुलीशी शादी करून इकडचाच झाला.’’

बराच वेळ ती मंडळी चर्चामसलत करत बसली होती. इकडचे बाजार, शेतातली पिकं, बादशाही प्रशासन आणि उत्तम घोड्यांच्या जाती, अशा अनेक विषयांवर चर्चा रंगली. रात्री उशिरा कोणातरी बड्या परिचित व्यक्तीचा खलिता घेऊन दोन व्यक्ती तिथे दाखल झाल्या. ते दोघेही वेदपुराणांचा अभ्यास केलेले आणि अनेक यात्रा पार पाडलेले, हुशार आणि चपळ तरुण दिसत होते. त्यापैकी एकाने आपला परिचय रामचंद्र सक्सेना आणि दुसऱ्याने कवी कलश असा करून दिला.

त्या सायंकाळी रामसिंगाकडे प्रतीतराय हरकारा आणि सिद्दी फौलादखान आपापली घोडी दौडवत घाईने येऊन धडकले. त्यांच्याकरवी बादशहाने एक जल्दीचा संदेशा धाडला होता, ‘‘रामसिंग बेटे, तू काहीही कर; पण तुझ्या

जंगली शिवाची समजूत घाल. त्याचा गुस्सा थंड कर.''

शिवरायांनी आग्र्याच्या दरबारातच आग पेटवल्याची ती घटना रामसिंगच्याच साक्षीने घडून आली होती. तोही तनामनातून पुरता हादरून गेला होता. शेवटी बादशहा म्हणजे ह्या भूमीतली अंतिम सत्ता. इथल्या प्रत्येक मनुष्याची मालमत्ता, सोनंनाणं, जगणं आणि मरणं, सारी शेंडीदांडी, सारं काही त्याच्या मुठ्ठीमध्ये. त्यांचा गुस्सा परवडणारा नव्हता. काही फासे उलटे घडून जिवाला अपाय पोचण्यापूर्वी काळजी घेतलेली बरी!

रामसिंगाचा जयपूर महाल राजांच्या मुक्कामापासून अगदी हाकेच्या अंतरावर होता. दरबारात नुकत्याच घडलेल्या आजच्या घडामोडींमुळे त्या रात्री रामसिंगही जागाच होता. काही केल्या त्यालाही लवकर झोप येत नव्हती. शिवाय ''बेटा रामसिंग, हवं तर तू तुझ्या पित्याला, मिर्झाराजांनाच विचार हवं तर, आमचं ह्या जुलमी बादशहाच्या दरबारात येणं झालं, ते कोणामुळे?'' राजांनी विचारलं होतं.

''राजे, आपल्या रक्षणाची जोखीम आमच्या पिताजींनी उचलली आहे, हे तर दुनिया जाणते.'' रामसिंग तणावाखाली उद्‌गारला होता.

त्यामुळेच या भेटीतून भलंबुरं काहीही उद्‌भवलं, तर त्याला रामसिंग आणि जयसिंग हे दोघे पितापुत्रच जबाबदार धरले जाणार होते; मात्र आज जो देखावा मुघलिया दरबारने अनुभवला, त्या दरबाराचा असा प्रचंड दरारा होता की, तिथे माणसं काय एखादी मुंगीसुद्धा आत सरकताना दहा वेळेस विचार करत असेल. अशा भयंकर ठिकाणी शिवाजीराजांनी अत्यंत संतप्त होऊन ज्या आरोळ्या ठोकल्या, दरबारची कडक शिस्त खुंटीवर टांगून ठेवली, त्यांची ही आग्रा नगरीतली सुरुवात फारशी काही चांगली नव्हती.

काही केल्याने झोपच डोळ्यांत उतरायला तयार नव्हती. त्यामुळे बेचैन रामसिंगने आपले हात-पाय मोकळे केले. तो आपल्या शय्यागृहातच येरझाऱ्या घालू लागला. त्याची नजर त्याच्या महालाच्या महिरपी खिडकीतून समोर जात होती. तिथे अंधारवाऱ्यात खड्या असलेल्या महाराजांसाठी मुकर्रर केलेल्या हवेलीकडे झेपावत होती.

वाढत्या रात्रीबरोबर रामसिंगच्या अंगातली बेचैनी खूप वाढली. उशीखालच्या एखाद्या इंगळीने चावा घ्यावा, तसा तो झट्‌कन उठला. थोड्याच वेळात आपल्या रात्रीच्याच चोळण्यावर आणि अंगरख्यावर तो हवेलीतून बाहेर

पडला. त्याच्या आगेमागे त्याचे शरीररक्षक झपाट्याने चालले होते. कंदिलांच्या लकाकत्या प्रकाशात अगदी थोड्याच वेळात ते पथक समोरच्या हवेलीजवळ जाऊन पोचलं. त्यापूर्वीच त्यांच्या आगमनाची वार्ता साथीदारांनी शिवरायांच्या कानावर घातली होती. त्यामुळे तत्काळ भेट घडून आली.

रामसिंगाने घाई केली. शिवरायांना समजुतीच्या अनेक गोष्टी सांगितल्या, ''राजन, थोडं सबुरीनं घ्या.''

''काही तकलीफ? आमच्याकडून?''

''आमच्या ह्या आग्रा नगरीमध्ये दरबारात पाऊल ठेवल्याच्या क्षणापासूनच बादशहा सलामतमध्ये आणि आपणामध्ये जो काही विस्तव पेटला आहे, ती चांगली बाब नव्हे.''

''पहिल्याच दरबारात तुमच्या बादशहा सलामतकडून मिळालेला अनुभवसुद्धा अजिबात चांगला नव्हता. इथे बोलावून आम्हाला अपमानितच करायचं होतं, तर तशी पूर्वकल्पना आम्हाला तुम्ही देऊन ठेवायची होती.''

''राजन, आपण बादशाही मेहमान आहात.''

''तेच तर आम्ही तुमच्या कानीकपाळी ओरडून सांगतो आहोत, बादशाही मेहमान म्हणजे आम्ही मोगलाईचे गुलाम नाही आहोत!''

''तशी गोष्ट इतनीशी होती. आपण बादशहांना कुर्निश न केल्याचं आवडलं नसावं त्यांना. त्यातून पुढचा ताणतणाव वाढत गेला.''

''रामसिंग! 'कुर्निश' या शब्दाचा आमच्या मायमराठीत शुद्ध अर्थ 'माथा टेकवणं', जो आम्ही फक्त आई-बाप , परमेश्वर आणि गुरूच्या चरणावर टेकवण्यात आमच्या जीवनाची धन्यता समजतो. कोणा बादशहाच्या पायावर डोकं ठेवायला, तो कितीही बडा असला, तरी तो काही आमचा बाप नव्हे! ह्या एका मुद्द्यावर तडजोड नाही. त्यासाठी राज्य काय, पण प्राणसुद्धा गमावण्यात ह्या शिवाजीला जन्माची धन्यताच वाटेल.''

''एखादं खूप धाडसी पाऊल प्राणावर बेतूसुद्धा शकतं, तुमची भूमी इथून खूप दूर आहे.'' रामसिंग काळजीने म्हणाला.

''बरोबर आहे.''

''चपळ आणि बळकट पाठीची घोडी बदलली, तरी किमान बारा दिवस लागतील, तुमच्या मातीत पोचायला. थोडं सबुरीनं घ्या!''

''रामसिंगऽ हे बघा, आमच्या हयातीत आजवर अनेक मृत्युप्राय

महासंकटांनी आम्हाला घेरल्याची अनेक उदाहरणं आहेत,'' राजांनी शांत सुरात रामसिंगला सांगितलं आणि विचारलं, ''बरं बोलाऽऽ तुमचा मनसुबा तरी काय आहे?''

''बादशहा सलामतशी उभा झगडा करणं मला काय, तुम्हालाही परवडणार नाही...शेवटी बादशहाची दौलत काबूल- कंदाहारपासून ते पूर्वेत आसाम कामरूप पर्यंत पसरली आहे. त्याची फौज म्हणाल, तर मोठमोठ्या मोगली ठाण्यांची फक्त गोळाबेरीज केली, तरी ती दहा-अकरा लाखांवर जाईल.''

''पण रामसिंग, बादशहाच्या भेटीची आम्हाला काही तहान लागली नव्हती. बुलावा तुमचा होता...''

''मान्य. थोड्याफार अपमानालाही आपणांस तोंड द्यावं लागंल...''

''थोड्याफार? काय बोलला आहात रामसिंग आपण? आम्हाला इकडे येण्यासाठी तुमचा बादशहा कळकळीने खलित्यावर खलिते धाडतो, अन् प्रत्यक्ष दरबारात समोरासमोर आलं तर ढुंकूनही बघत नाहीत?... धिक्कार! धिक्कार असो ह्या मग्रुरीचा आणि अरेरावीचा...''

''राजे, जे झालं ते विसरून जा...'' चाचरत रामसिंग म्हणाला.

''विसर आणि भूल तुम्हाला पडलीय. इकडे निघायच्या आधी काय बोलणी झाली होती? एकदा तिकडून निघण्यापूर्वीच सालगिरहचा दरबार संपताच आपण मायदेशी जायला मुखत्यार असल्याचं मान्य करता आणि इथं पोचल्यावर मात्र कोलांटी उडी मारता, एखाद्या सामान्य कैद्याप्रमाणे आम्हाला बंदिवान बनवता?''

रामसिंग राजांच्या अगदी जवळ आला. आपल्या वडील भावाचं मनगट पकडावं, तसा राजांचा हात धरत तो बोलला, ''राजे, थोडंसं सबुरीनं घ्या... तुम्हाला बादशहा सलामतना मान द्यावाच लागेल. शेवटी इकडचा मुलूख आणि रियासत बादशहा साहेबांचीच आहे.''

''मान द्यायचा म्हणजे करायचं काय?''

''उद्यापासून बादशहाच्या दरबारात हजेरी लावावी लागेल...''

रामसिंगच्या त्या प्रस्तावावर राजे काही क्षण तसेच अबोल राहिले, ते थोडे चिंताग्रस्त दिसले. थोड्या दमाने एक सुस्कारा सोडत बोलले, ''कळवा बादशहांनाऽऽ आमची तूर्तास तब्येत ठीक नाही...''

''हे उत्तर त्यांना पटायचं नाही...''

‘‘हे पाहा रामसिंगऽऽ ज्या जागेवर आमची जाणूनबुजून मानहानी झाली, आम्हाला मुद्दाम अपमानित केलं गेलं, त्या जागी पुन्हा पाऊल ठेवण्याच्या कल्पनेनं- सुद्धा आमचा जीव कासावीस बनतो.’’

‘‘बरं राजन, कृपा करा, एक गोष्ट तरी मान्य कराल? परिस्थिती थोडीफार निवळेपर्यंत...?’’

‘‘बोला!’’

‘‘आपल्याऐवजी आपल्या युवराजांना, शंभूराजांना आमच्या सोबत दरबारी पाठवा.’’

त्यावर राजे काही बोलले नाहीत; पण रामसिंगाचं म्हणणं ऐकून त्यांच्या चर्येवर होकाराची झाक दिसली.

त्या दोघांमध्ये बऱ्याच इकडच्या-तिकडच्या गोष्टी झाल्या; मात्र सावधगिरी नावाच्या एका मोठ्या बाणाचं टोक शिवरायांच्या अंतर्मनाला सतत बोचत होतं. विषारी मगरीसुसरींनी भरलेल्या नदीच्या डोहात दिवस काढणं आणि त्यातून मुश्किलीने जिवंत राहणं हे त्यांच्या नशिबी आलं होतं. म्हणूनच त्यांनी रामसिंगला सहजगत्या विचारलं, ‘‘कुँवरसाहेब, तुमच्या बादशाही दरबारातला सर्वांत ज्येष्ठ अंमलदार कोण?’’

‘‘जाफरखान. याआधी ते दिवाण होते. आता वजीर बनवले गेले आहेत.’’

‘‘हे त्यांच्या आयुष्यभराच्या कर्तबगारीचं फळ समजायचं की दुसरं काही?’’

‘‘कर्तबगारी तर आहेच; पण राजव्यवहारात मनुष्य जाणकार असेल आणि कर्मधर्मसंयोगाने त्याची बीवी अतिसुंदर असेल, तर असे शक्स राजकाजात सर्वत्र सर्वकाळ उठून दिसतात.’’

‘‘अच्छा?’’

‘‘तशा नात्याने साहिबजी बेगम ह्या बादशहा सलामतच्या मावशीच म्हणजे प्रसिद्ध मुमताज महलच्या बहेना. फिर क्या कहना? आपणांस ठाऊक असेलच. अवघ्या दोन-तीन महिन्यांपूर्वीच बादशहा शहाजहान साहेबांचं दुःखद निधन झालं. त्यानंतरच औरंगजेबसाहेब दिल्लीहून यमुना नदीतून एका बड्या जहाजासारख्या शाही नावेतून इकडे आग्र्याकडे निघून आले. त्यांच्या पाठोपाठ त्यांचं चौदाशे बैलगाड्या भरून सामानसुमानही आलं.’’

‘‘असं का?’’

‘‘तेव्हा इकडे निघण्यापूर्वी त्यांनी ह्याच जाफरखानच्या हवेलीत जाऊन

त्यांच्यावर अक्षरशः हिऱ्यामाणकांची खैरात केली. त्याच भेटीत त्यांना वजिरीही देऊन टाकली.''

''अस्सं...? अन ते शाहिस्ताखानसाहेब असतात कुठे?'' शाहिस्त्याच्या आठवणीने रामसिंगच्या चेहऱ्यावरही हास्य ओघळलं.

''राजे, आपण त्या लाल महालात आपल्या तलवारीच्या टोकाने शाहिस्ता साहेबांच्या उंगलियाँ उडवल्या. तेव्हापासून त्यांचे ग्रहच फिरले आहेत.''

''त्यांनी इकडची कुठली सुभेदारी बदलून मिळावी म्हणून कोशिस केली नाही का?''

''तुम्ही दिलेल्या तडाख्यानंतर त्यांची बंगाल-आसामच्या सुभेदारीवर नेमणूक झाली. औरंगजेबसाहेब त्यांच्यावर असे प्रचंड चिडले होते म्हणून सांगू, चार-आठ दिवसांच्या दिल्लीभेटीची त्यांची विनंतीही बादशहाने ठुकरावून दिली. तेव्हापासून शाहिस्तासाहेब आसामाकडेच गंजत पडले आहेत.''

''कमाल आहे म्हणायची.''

''मात्र राजे, ही परिस्थिती अशीच अधिक काळ राहील असं वाटत नाही. वजीर आणि शाहिस्तासाहब हे दोघे पडले एकमेकांचे साडूभाऊ.''

''हो का?''

''त्यात शाहिस्तासाहेबांची खासिया बेगम नवऱ्यासोबत तिकडे आसामकडे गेलेलीच नाही.''

मध्येच बोलता-बोलता रामसिंग काहीसा गोंधळून स्तब्ध झाला. तसे राजे बोलले, ''स्पष्ट बोला, काय असेल ते.''

''आपण आग्र्याला येणार हे समजल्यापासून ती खासिया बेगम अक्षरशः पागल बनलीय. आजकाल ती इथल्या किल्ल्यात, राजमहालात आणि निजी महालातून झपाटल्यासारखी फिरते आहे, 'सिवाचा बदला घ्या' असा दिन-रात पुकारा करत चकरा काटते आहे.''

राजे उपहासाने हसत बोलले, ''म्हणजे या भूमीत आमच्या हितचिंतकांची संख्या काही कमी नाही!''

''हो राजे, इथे दरबारात पोचण्यापूर्वीच आपलं बरंवाईट व्हावं म्हणून अनेक जण इथे बेचैन आहेत.''

''त्यात तुमचे हे जाफरमियाँ पट्टीचे शराबी आहेत म्हणे?''

राजांनी ती शंका विचारताच रामसिंग चपापला. इथे पोचण्यापूर्वी राजांनी

इकडची बरीच खबरबात संग्रहित केल्याची त्याला कल्पना आली. त्याच मुद्द्याचा पदर पकडत शिवरायांनी पुढचा प्रश्न केला, ''ह्या ज्या कोणी जहानारा नावाच्या बेगम आहेत, त्यांचा बडा रुतबा, वचक इकडे चालतो असं कानावर आलं आहे.''

''हो ऽऽ मोठी कर्तृत्ववान, हिंमतबाज स्त्री आहे ती, बादशहा सलामतची बडी बहना, मशहूर शायरा, बडी ग्यानी औरत! आमच्या शहाजहान साहेबांच्या काळापासून इकडच्या सार्वजनिक बड्या-बड्या इमारतींचं जे इमारत निर्माण खातं आहे, तो सारा कारोबार जहानाराआपांच्या ताब्यात आहे. इथली आग्र्याची भव्य जामा मस्जिद असो किंवा तिकडचा दिल्लीच्या दर्यागंजमधला चांदणी चौक. अशा अनेक छोट्या-मोठ्या इमारती जहानारा साहेबांच्या करड्या नजरेखाली बांधून झाल्या आहेत.''

''एक स्त्री असूनही?''

''हो, शिवाय इथे आग्र्यामध्ये गरीब मुलांच्या शिक्षणासाठी मदरसा-पाठशाळा उघडण्यामागची प्रागतिक नजर जहानारा आपांचींच.''

''अरे वा! मोगलाईमध्ये एका स्त्रीची एवढी मोठी मुसंडी?'' शिवरायांनी आश्चर्य व्यक्त केलं.

''राजे, ह्या आमच्या जहानाराआपांबाबत मी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगेन.''

''कोणती हो?''

''मुघल दरबारात शंभर बलदंड तोफांची ताकद एका बाजूला आणि जहानारा आपांचं सामर्थ्य दुसऱ्या बाजूला.''

''काय सांगता?''

''स्पष्टच सांगायचं, तर औरंगजेबासारख्या स्वत:च्या मतीनं आणि गतीनं चालणाऱ्या बादशहावर आज कोणाचाच काबू नाही; मात्र त्यांनाही विशिष्ट कारणासाठी मोहित करण्याचं सामर्थ्य फक्त जहानाराआपांमध्ये आहे.''

''काय सांगता आहात रामसिंग?''

''राजे, कधी-कधी काही व्यक्ती स्वतःच्या अंगभूत प्रतिभेच्या जोरावर पोचतात कळसालाऽऽ! ''

त्या भेटीत राजांनी जाफरखान आणि जहानारा या दोघांच्या बाबतीत बऱ्याच नव्या गोष्टी जाणून घेतल्या. शिवाय त्याच बैठकीत मोगलांच्या

लष्करदलाचे मीरबक्षी अमीनखानसुद्धा इकडे किती महत्त्वाचे आहेत हेही राजांनी जाणून घेतलं.

''आबासाहेब, आपण असे निर्धारी पुरुष. तुमच्या चर्येवर कधी दुःखाचा लवलेश दिसत नाही. हुंदकाही फुटत नाही.''

''मतलब?''

''एखाद्या कडेकपारीवरच्या लेण्यांतून हळूच बूंद बूंद जलबिंदू पाझरावेत, तसे आपले नेत्र मघापासून आपोआप का ओलावताहेत?''

''वाहऽऽ शंभू! या कैदखान्याच्या अंधारातसुद्धा तुम्हांला तुमचं कवीहृदय जागवत आहे म्हणायचं.''

''आबाऽऽ आमच्या प्रश्नाचं हे उत्तर नव्हे, सांगा खरं...''

''बाळराजे! शेवटी तुमचे पिता राजे असले, तरी ते एक माणूसच आहेत, त्यामुळे दुःखाच्या जाणिवेने हृदयातला एखादा पापुद्रा कधी-कधी चिरतो. अन् अश्रूंचा पाझर हळूच बाहेरची वाट शोधतो. त्यात आश्चर्य ते कसलं?''

''समजलो नाही आबा...?''

''बाळराजे, कळीचा मुद्दा हाच की, इकडे यमुनेच्या काठाकडे मार्गक्रमणा करताना आपली परिस्थिती अत्यंत बिकट नव्हे तर शोचनीय होती, हे वास्तव कसं विसरायचं?''

''त्याचा काय मतलब, आबा?''

''माझ्या शंभूबाळा ऽऽ अहो इकडची वाट चालताना एक प्रकारे आपण आपलं राज्य कमावून नव्हे तर गमावून आलो आहोत...''

''आबा...?''

''होय... थोडाथोडका नव्हे, चार कोटी होनांचा मुलूख, तेवीस किल्ले आणि वर अद्यापि न जिंकलेल्या बालाघाटासाठी दोन कोटी होनांच्या खंडणीचा वायदा. तोही तेरा हप्त्यांचा— बाळराजे, तसं पाहता पुरंदरच्या कराराच्या त्या नामुष्कीनंतर काय उरलंय काय आपल्याकडे? एक लाख होनांचा मुलूख आणि बारा किल्ले फक्त? हा सवाल आणि त्याबाबत होणारी आगपाखड ही फक्त नेताजी पालकरांच्या किंवा अन्य विचारी मंडळींच्या उरातली नव्हे. ह्या वाताहतीच्या कल्पनेने आमच्याही काळजाची चाळण होते!''

आपल्या पित्याच्या तोंडूनच आपल्या स्वराज्याची झालेली ती दारुण

अवस्था ऐकून शंभूराजांचं मन भरून आलं. त्यांनी घोगऱ्या आवाजात विचारलं, ''आबासाहेब, आता पुढे कशी घ्यायची धाव?''

आपल्या राजपुत्राला पोटाशी घट्ट पकडत शिवराय म्हणाले, ''बाळराजेऽऽ आपली सारी धनदौलत, आपली पुण्याई, आपलं जगणं आणि मरणं म्हणजे आपला सह्याद्रीचा मुलूख. जसं आभाळाच्या छतावर चांदसुर्व्याचं राज्य, तसं देवानं अन् दैवानं आपल्यासाठी सह्याद्री आणि दख्खन प्रांत आखून दिलाय.''

''पण आबासाहेब, आपली ती मंगल धरती कित्येक कोस दूर राहिली आहे आपणापासून?''

''तेच सांगतोय बाळराजे. मोगलांच्या या जुलमी खाईतून आपल्या मुलखाकडे धाव घेणं खूप महत्त्वाचं!''

''खरंय आबा!''

''ज्या गोड्या पाण्याच्या विहिरीत आपण हिंदवी स्वराज्य नावाची सुवर्ण घागर जवळपास गमावली आहे, त्याच डोहात हिमतीने उडी घेऊन, ती घागर नव्हे तर स्वराज्याचा तो अमृतकुंभ आम्हांला कोणत्याही स्तिथीत बाहेर खेचून काढावा लागेल.''

''पण आबा, औरंग्या नावाचा हा जुलमी बादशहा...?''

''होय. अजगराच्या पोटातून आणि सुसरीमगरींच्या काटेरी जबड्यातून एखाद्याची सुटका होणं मुश्किलच...''

''मग कसं हो आबा?'' शंभूराजांनी काळजीनं विचारलं.

''चिंता नसावी बाळराजे, मैदानातल्या दहा लढाया गमावूनही जो मनात जंग हारत नाही, तोच इसम महान जगज्जेता ठरतो, बाळराजेऽऽ!''

''पण आबासाहेब, अशा संकटमालिका आपल्याच वाट्याला का याव्यात?''

''बाळराजे! तुमच्या आज्जीसाहेबांनी, आमच्या मातोश्रीनीं आम्हाला वेळोवेळी याची जाणीव करून दिलीय की, आपण वेरूळकर भोसले. आपलं कुलदैवत म्हणजे भगवान शंकर! घृष्णेश्वर, भुलेश्वर आणि शिखर शिंगणापुरीचा शंभू महादेव. आपल्या महादेवाला काय कमी विष प्राशन करावं लागलं होतं?... बाळराजे! स्वराज्याच्या आपल्या अमृतकुंभाचं संवर्धन करण्यासाठी आणि त्याचं वैभव वाढवण्यासाठी, यापुढेही आपल्या जीवनामध्ये पदोपदी, एकदा नव्हे तर अनेकदा जहराचे घोट अमृत समजून आम्हांला रिचवावेच लागतील!''

निर्धाराने शिवराय म्हणाले.

ती आग्रा शहरातली दुसरीच सकाळ. जयपूर महाल परिसरातल्या त्या अनेक इमारतींचे समूह. बाजूने वृक्षवल्लीही खूप होती. त्यामुळे पाखरांच्या किलबिलाटाने ती सुंदर सकाळ डोळे चोळीत जागी झाली होती.

त्या परिसराचा कुणालाच काही अंदाज नव्हता. औरंगजेब या शब्दाचा अर्थच दगाफटका, असत्य आणि जुलूम असा बनला होता. त्यामुळे राजांचे सारे सहकारी खूप सावध होते. राजांना मुकर्रर केलेल्या हवेलीबाहेर अनेक शाही रखवालदारांचा पहारा होता; मात्र राजांच्या सुरक्षेसाठी प्राणाची बाजी लावणारे त्यांचे सहकारी अखंड सावधान होते. हवेलीच्या दारात रात्रभर इकडची गुलाबी थंडी पाठीशी आणि समोरची शेकोटी पोटासमोर धरून राजांच्या दोन बड्या सहकाऱ्यांनी आख्खी रात्र जागून काढली होती. एक होते हिरोजी फर्जंद आणि दुसरे तानाजी मालुसरे.

सकाळसकाळी पन्नाशी उलटलेली एक बावळट प्रतिमेची व्यक्ती तिथं अवतरली. अंगात पठाणासारखा लंबा, ढगळ सदरा आणि डोईला लकपक मुंडासं. त्याच्यावर एक मोगलाई रियासतीचं चिन्ह असलेला खोचलेला तुरा, अशा आविर्भावात अजीबो गरीब असा चेहरा करत सुमेरलाल तिथे उगवला. ‘‘सल्तनत का राजनाई’’ अशा रुबाबदार उच्चारात त्याने बाहेर चौकीजवळ बसलेल्या अंमलदारांना आपला परिचय करून दिला. तेव्हा हिरोजी फर्जंदांनी त्याची गंमत उडविली.

‘‘पण तुमचा तसा आम्हांस उपयोग काय सुमेरजी? आमच्या राजांना लांब निमुळती दाढी आणि मस्तकावर तसेच लांब केस ठेवायला आवडतात.’’

‘‘पण, मी त्यांची सेवा करायला उत्सुक आहे.’’

‘‘अहो, पण इथे काही कामच नसेल तर...?’’

‘‘अजी हुजूर! बाल ना सही, मनुष्याला नाखूनही असतात म्हटलं...’’

सुमेरलालचा बाहेरचा वितंडवाद आत राजांच्या कानी गेला. तसं त्यांनी त्याला आत बोलावून घेतलं. लगेच सुमेरलालने आपण डोईची चंपी आणि हातापायाची रगडाई कशी छान करतो, याचा पाढा राजांपुढे वाचला. त्यावर राजांनी रघुनाथपंतांना खुणावलं. पंतांनी भरपेट द्रव्य सुमेरलालच्या ओट्यात घातलं. शिवरायांकडून मिळालेली बिदागी अपेक्षेपेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. सुमेरलाल आता खूश झाला; पण राजांचा एखादाही अवयव रगडाईसाठी

त्याच्या हाती लागला नाही, त्यांच्या डोईची चंपी करायची संधी मिळाली नाही, त्याचं मात्र त्याला खूप दुःख झालं.

त्या दोन-तीन दिवसांत धोबीही स्वतः येऊन बसला. राजांच्या वस्त्रांची धुलाई आपण किती उच्च दर्जाची करून देऊ, ''जब मैं बच्चा था, तब जहांगीरसाहब की सलवार मेरे हाथ आई , तबसे मेरी तकदीर बदल गई।'' अशा तो लंब्याचौड्या गोष्टी करत होता.

स्वतः शिवराय, हिरोजी फर्जंद आणि रघुनाथपंतांसह सर्वांच्या ध्यानात एक बाब आली. राजे तिथं दाखल झाल्यापासून बादशहाच्या महालातले कर्मचारी म्हणून धोबी, न्हावी, स्वयंपाकी, अशी मंडळी तिथे वारंवार घिरट्या घालत होती. आपापल्या कामामध्ये ती अतिशय पारंगत होती; पण दुसऱ्या दिवशी राजांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगून टाकलं, ''ह्या बादशाही वाड्यातून कोणतंही व्यक्तिगत सेवेचं काम सांगून जी मंडळी जवळ चिकटू पाहताहेत, त्यांना चार हात अंतरावर ठेवा...''

''पण राजे?''

''त्यांच्या हालचाली आम्हाला खूप सावध आणि संशयास्पद वाटतात. मेहमाननवाजीपेक्षा त्यांची हेरगिरीकडे जास्त नजर दिसते.'' राजांनी निर्णय दिला.

## सिवा को अपना बनाईये

त्यानंतर उगवला सोमवार. सोमवारची ती सकाळ बादशहा औरंगजेबासाठी अनोखा रंग घेऊन उगवली. पलीकडच्या यमुना नदीतलं आणि आजूबाजूच्या वृक्षांवरचं नव्हे तर आतल्या महालातलंही धुकं अद्याप हटलं नव्हतं. तोवर समोर आपल्या मावशीचे यजमान, मौसाजी वजीर जाफरखानासारखे बुजुर्ग, शाहिस्तेखानाची बेगम खासिया आणि राणा जशवंतसिंगासारखे बलाढ्य सरदारही दाखल झाल्याचं बघून औरंगजेब आश्चर्यचकित झाला.

आपल्या खासगी दालनाकडे आपल्या रिस्त्यानात्यातली जवळची माणसं, अन् तीही इतक्या भल्या सकाळी उगवावीत, त्यापाठोपाठ आपली बहीण जहानारा आपासुद्धा इकडेच यायला निघाल्याचा निरोप मिळावा, या साऱ्या गोष्टींचा बादशहाला अचंबाच वाटला.

जाफरखान आणि जशवंतसिंग या दोघांचे चेहरे नाराजीने काळवंडलेले दिसत होते; मात्र त्यांच्या तक्रारीचा सूर खूप चढा होता, ''हुजूर, परवाचा दरबार

आणि त्यात त्या सिवाने माजवलेला उडदंग आम्हां कोणालाही बिलकुल पसंत पडलेला नाही जहाँपन्हा!'' अमीनखान बोलला.

''सिवा जैसे बहुत भूमिये-फुकटे जमींदार आयेंगे और जायेंगे, लेकिन मुघलिया दरबार की बेइज्जती हम कैसे बरदास्त करें हुजूर?'' जशवंतसिंग म्हणाला.

''देखिये, सिवासारखा साधारण भूमिया असा जहाँपन्हांच्या समोर दंगाफसाद करू लागला, तर मोठी मुसीबत खडी होईल,'' वजीर जाफरखानाने इशारा दिला.

''अशा नादानियाँ वेळेत कशा ठेचून काढायच्या हा आपलाच अधिकार. त्यासाठीच सिवासारख्या घमंडी इसमाला वेळेत त्याची जागा दाखवणं योग्य होईल.'' या मुद्द्यावर सर्वांचं एकमत झालेलं दिसत होतं.

बाहेर निजी महालाच्या चौकात बादशाही खिदमदगारांची आणि खोजांची मोठी धांदल उडाली. तिथे कोणी सल्तनतमधली बडी असामी आली असावी, असा गडबडीचा आणि वर्दळीचा आवाज आला. तितक्यात तिथे एक मोठी शाही पालखी येऊन थांबली. मखमली पोशाखातले ते राजभोई आजूबाजूला ऐटीत उभे राहिले. अशी सोन्याचा पत्रा असलेली दुसरी महंगी पालखी फक्त औरंगजेब बादशहाकडेच होती.

आग्रा किल्ल्याच्या अगदी समोरच्या बड्या बागेजवळ बादशाही हुकमानुसार अन्य कोणास कसलीही इमारत बांधायची परवानगी नव्हती; मात्र त्या ठिकाणी आजकाल एकच तीन मजली शानदार अशी उंच हवेली उभी होती. जी 'बादशाही बेगम' या प्रतिष्ठित पदावर विराजमान झालेल्या जहानारा बेगमेसाठी शहाजहान बादशहाने खास बांधून घेतली होती. तिथून प्रातःकाळी निघालेली ती पालखी भव्य अजमेरी दरवाजा ओलांडून आत समोरच्या अंगणात येऊन पोचली. त्यातून पाठोपाठ पांढऱ्याशुभ्र पेहरावातल्या, उंच, कुर्रेबाज जहानारा बेगम बाहेर आल्या. ही औरंगजेबापेक्षा चार वर्षांनी मोठी असलेली त्यांची आपा. तिच्या दर्शनाने पाण्यात साखर विरघळून जावी, तशी औरंगजेबाच्या मनाची नाजूक अवस्था झाली.

जहानाराच्या डोळ्यांच्या बाहुल्या तपकिरी होत्या. ती तेजस्वी चर्येची आणि सडपातळ बांध्याची शहजादी शहाजहानला खूप आवडत असे. ती मनाने खूप निर्मळ आणि पाक म्हणजेच पवित्र होती. तिला आपल्या गटात ओढण्यासाठी

तेव्हा औरंगजेबाने खूप कोशिश केली होती; मात्र औरंगजेबाचं वैभव, त्याची धनदौलत आणि त्याच्या जवाहरातीच्या ढिगांकडे तिने ढुंकूनही बघितलं नव्हतं. उलट शहाजहानसारख्या आपल्या बुड्ढ्या, एकाकी आणि विकलांग बापाची सेवा करत राहणं हाच तिने आपला जन्मभराचा मकसद ठरवला होता.

मात्र, आज आपल्या अमलाखाली काबूल, कंदाहारपासून पूर्वेत कामरूप-आसामपर्यंतची सल्तनत येऊनसुद्धा औरंगजेब मनातून दुःखीच होता. मायाममतेचं जवळपास कोणी उरलं नव्हतं. ज्या जिवलगांच्या संगतीत बालपणीचा काळ पहिला, तारुण्याच्या नव्हाळीतल्या दिवसांची गोड-आंबट चव चाखली; मात्र महत्त्वाकांक्षा नावाच्या नागिणीने त्या साऱ्या रिश्तेदारांचा चावा घेतला होता. आता बादशहा असूनसुद्धा मनाने औरंगजेबाची अवस्था भिकाऱ्याहून भिकाऱ्यासारखी झाली होती. विशेषतः, जहानारासारखी आपली मोठी बहीण जवळ येताच त्याला आपल्या कर्मदारिद्र्याची जळजळीत जाणीव झाली.

अवघ्या काही महिन्यांपूर्वी त्यानं आपल्या जन्मदात्या बापाचं, शहाजहानचं प्यायचं पाणी तोडलं होतं, तेव्हा तो मग्रुरीने फुदकला होता; मात्र जेव्हा बिस्तरवासी झालेला बुड्ढा शहाजहान मरणासन्न अवस्थेला पोचला, तेव्हा किमान डोळे मिटण्यापूर्वी तरी दुनियेत कीर्तिवंत असलेल्या आपल्या बापाने आपणाला माफ करावं, अशा विचाराने औरंगजेब कासावीस झाला होता; पण मधल्या त्या एकापाठोपाठ एक घडलेल्या कडू घटनांच्या मालिकेनंतर ती गोष्ट शक्य नव्हती.

शहाजहानच्या मनातला आपल्याबद्दलचा विखार फक्त जहानाराआपाच घालवू शकते, आपल्या ह्या बड्या दीदीच्या गोदीमध्ये मुराद, दारासह आपण सर्व भावंडं लहानाची मोठी झालो. बाळपणातल्या त्या सोनेरी आठवणी दुष्ट औरंगजेबसुद्धा विसरू शकला नव्हता. तो जहानाराच्या मागेच लागला होता, ‘‘मेरी आपा, काहीही कर, लेकिन अब्बा हुजूरको मेरे लिए अपना नजरिया बदलनेपर आमदा कर. त्यांना इल्तिजा कर की, एक मरतबा मोठ्या दिलाने मला माफ करा.’’

औरंगजेबाच्या त्या इच्छापूर्तीसाठी जहानाराने आपल्या बापाच्या पायावर अनेकदा नाक घासलं होतं. शहाजहानने शेवटच्या काही दिवसांत जहानाराची ती विनंती मान्य केली होती. डोळ्यांतून वाहणारे गरम अश्रू पुसत

आणि भरलेल्या छातीतून गुदमरलेल्या हुंदक्यांना कशीबशी वाट मोकळी करत औरंगजेबाला शहाजहानच्या मुखातून ''माफ किया!'' असं कण्हत्या कंपमय आवाजात ऐकायला मिळालं होतं.

अशी ही पुऱ्या शाही परिवाराची आपा बनलेली जहानारा. तिने शिवाजीराजांचं प्रकरण तापलेलं असताना आपल्या भेटीस यावं, याचा बादशहाला अचंबा वाटत होता. जहानाराने तिथे प्रवेश करताच शाहिस्तेखानाच्या खासिया बेगमेचा उत्साह फारच वाढला. तिनेच शिवाजीविरुद्ध आपल्या भाचीला याआधीच गेल्या काही दिवसांत अनेकदा भेटून पेटवलं होतं. भडकावलं होतं.

''आपा, सुरतेच्या बरबादीची फिर्याद घेऊन तुम्ही आला नसता, तरी मी थांबलोच नसतो. अभी आपा, उस मरगट्ठोंको जरूर सजा मिलेगी।''

त्यावर धिम्या आणि गंभीर सुरात जहानारा म्हणाली, ''सुरतेपेक्षा बादशहा सलामत, मला महत्त्वाचं वाटतं ते म्हणजे या सिवाने शाहिस्तेमामांच्या खानदानाची जी दशा केली, तो सारा प्रकार मला खूप दर्दनाक वाटतो. खासिया मासींकडे बघा. इन्होंने तो अपने दो-दो सौतेले बेटे, और अपना शहजादा भी गवाया हैं। ह्या सिवाबद्दल जेवढ्या गहराईने सोचविचार करू लागते, तब मेरा सर जलने और चकराने लगता हैं।''

''लेकिन आपाऽऽ हा शैतान लुटेरा सिवा तिकडे दक्षिणेत भाबड्या लोकांना 'फरिस्त्या' सारखा, देवदूतासारखा वाटतो.''

तेव्हा जहानाराने औरंगजेबाला पट्‌कन सांगून टाकलं, ''किसी को तलवार की धार से बेरहमीसे चीरकर खामोश करना, या उसे हाथी के पाँवतले रौंदकर जमीन में जिंदा दफनाना, ही हुन्नर तर औरंगजेब तुमच्या रक्तातच आहे.''

''हे काय बोलता आहात आपा आपण?''

''सही तो बात कर रही हूँ... आपके खून में जो बेदर्दी और बेरहमी छुपी हैं, उसे फिरसे जगा दोऽऽ''

''जरूर आपा।''

''उसे जितनी जलदी खत्म कर दोगे मानो उतनाही मुनाफा हैं। लेकिन अगर उसे जिंदा रखने में जरा भी देर हुई तो वह तख्त-ओ- ताज के दिल में चुभनेवाला जहरी काँटा बन जाएगा। नुकसान करेगा। उठो ऽऽ जल्दी खतम करो उस जहन्नमी मरगठ्ठेको!'' जहानाराने आपल्या खुनशी भावाला जणू हुकूम दिला.

मोगल दरबारातल्या अंमलदारांमध्ये आणि दरकदारांमध्ये संतापाची

लाट पसरली होती. दक्षिणेतला एक भूमिया - जमीनदार बादशहा सलामत यांच्यासमोर ज्या तोऱ्याने उभा राहतो, त्यांच्या शब्दास शब्द देतो, कोणी कधीच न मोडलेले मोगली दरबाराचे रीतिरिवाज खुंटीवर टांगतो, असा परवाचा तो सारा प्रकार कोणालाही रुचण्यासारखा नव्हता.

औरंगजेबाभोवती त्या सकाळी गोळा झालेल्या त्याच्या निकटच्या रिश्तेदारांनी एकच धोशा लावला होता. परवा शिवाजीने भर दरबारात घातलेला गोंधळ, त्याची ती अरेरावीची भाषा, बादशहाच्या तोंडावरच खिलतीची वस्त्रं न स्वीकारायचा तो उद्दामपणा, असा प्रकार याआधी कोणाकडूनही घडला नव्हता. त्यामुळेच झाल्या गुन्ह्याप्रकरणी शिवाजीला तत्काळ सजा फर्मवायला हवी, अन्यथा ही जखम चिघळेल, मोगल सल्तनतीच्या इज्जतीचा फालूदा व्हायला वखत लागायचा नाही असा सर्वांचा नूर होता.

शिवाजी या विषयावर विचार करताकरता औरंगजेबाने कालची अर्धी रात्र झोपेविना घालवली होती. सुरतेची ती लूटच नव्हे तर जुन्नरसारख्या मोगली ठाण्यावर शिवाजीने तरुण, पोरगेल्याशा वयात घातलेला तो धाडसी छापा, उंबरखिंडीत कारतलबखानाची आणि त्याच्या सोबतच्या बड्या फौजेची उडवलेली मजाक, शाहिस्तेमामाची तुटलेली बोटं, या साऱ्या हरकती त्याला आठवल्याच; परंतु स्वत: औरंगजेब जेव्हा दक्षिणेत सुभेदार होता, तेव्हा ह्याच गावगुंडाने औरंगजेबाला पाठवलेला तो अजब तोहफा! एका भटक्या कुत्र्याच्या शेपटीला बांधलेला औरंगजेब बादशहाच्या हुकमाचा तो कागद आणि त्याची गावातून काढलेली धिंड, त्या खास प्रसंगाची काटेरी याद येताच औरंगजेबाच्या उरातून संतापाचा उद्रेक बाहेर पडला,

''सच बोलूँ तो ज्या दिवशी ह्या इसमाने आमच्या दरबारात दंगाफसाद केला, उसी दिन उसकी मौत तय हो चुकी थी!''

''जहाँपन्हा?''

''लेकिन उस रोज मुझे रुकनाही नहीं चाहिये था।''

''का, का थांबलात जहाँपन्हा?''

''काही ग्यानी आणि बुजुर्ग मंडळींनी रोखलं मला. समजावलं, 'आपकी पच्चासवी सालगिरह हैं, ऐसे मुबारक औसरपर आपके हाथोंसे खराब काम न बने।'''

न राहून खंतावल्या शब्दात औरंगजेब म्हणाला, ''अलीकडच्या काळात

आमच्या उच्चाकांक्षी सग्या भावांची आमच्याकडून झालेली मौत! तशातच बुलावा पाठवून आणलेल्या मेहमानाला आम्हीच कत्ल केलं, तर सारी दुनिया आम्हांकडे फक्त एक हत्यारा अशा नजरेने बघेल. बस उसी सलाह की वजहसे मैं चूप बैठा, वरना उसी दिन उसकी मौत तय थी।'' चडफडत औरंगजेब म्हणाला.

''लेकिन हुजूर! सिवा कभी सुधरेंगा नहीं।''

''उसे सुधारनाही होगा!'' म्हणत औरंगजेबाने एक मोठा सुस्कारा सोडला.

त्या दिवशीच्या सकाळच्या आणि सायंकाळच्या दोन्ही दरबारांकडे शिवराय फिरकले नाहीत. सकाळी रामसिंग बादशहाच्या जवळ मुजरा करण्यासाठी दाखल झाला. त्या वेळी बादशहांनी त्याला मुद्दाम आठवणीने विचारलं, ''क्या आज सिवा आनेवाला है?''

''बुखार से बीमार हैं वो जहाँपन्हा!'' असं बोलून रामसिंगने कशीबशी वेळ मारून नेली.

मात्र, सायंकाळच्या दरबारात कुँवर रामसिंग यांच्यासोबत शंभूराजे हजर होते. त्यांनी बादशहाला मुजरा केला. तेव्हा शंभूबाळांची तेजस्वी मुद्रा, आकर्षक आणि चमकदार डोळे आणि अंगरखा, सलवार आणि छोट्या मंदिलातलं ते देखणं रूप पाहून बादशहा खूश झाला. त्याने दरबारी मामलेदाराला खुणावलं. तेव्हा बादशहामार्फत शंभूराजांना सरोप्याची वस्त्रं देण्यात आली. तसंच एक रत्नजडित जांबिया देऊन, त्यांच्या गळ्यामध्ये पाचूंचा रत्नहार घालून त्यांचा सन्मान करण्यात आला.

बाहेर अंधार दाट होऊ लागला, तशी औरंगजेबाच्या अंगातली आग पुन्हा भडकू लागली. जवळ दिमतीला दोन-पाच हजारांची फौज नसतानाही शिवाजीराजा नावाचा एक दख्खनी अहंकारी मनुष्य अशी कशी मिजास दाखवू शकतो? काय वाट्टेल ते झालं, तरी शिवाजीराजे आजच्या दरबारात दाखल होतील ही बादशहाची अपेक्षा पाल्यापाचोळ्यासारखी उडून गेली होती.

जहांगिरी महालात सायंकाळची चिरागदानं पेटली की औरंगजेब शक्यतो आपल्या उदेपुरी बेगमेला टाळत असे. एक तर ती शराब पिऊन बेधुंद झालेली असे. अन् नको त्या स्थितीमध्ये कोणत्याही वेळी ती काय करेल याचा अंदाज नसे; पण आज तिन्हीसांजेच्या नमाजानंतर तिने औरंगजेबाला गाठलं. आपल्या शय्यागृहातच एक पत्र त्याच्यापुढे सादर केलं.

''किसका खत है यह?''

‘‘आपल्या शाहिस्ताखानमामूंचं.’’

‘‘काय संदेशा आहे शाहिस्तासाहेबांचा?’’

‘‘सिवाजीबद्दल एक कडक पैगाम आहे... सिवा बडा खतरनाक गनीम हैं। उसे सीधा मार डाला जाय।’’

‘‘देखते हैं...’’ अनिच्छेने औरंगजेब उद्‌गारला.

‘‘त्यांनी पुढं असा खुला इशारा दिला आहे की, जर तुम्ही शैतान सिवाला माफ कराल, त्याला रिहा कराल, तर मात्र मी तुमची मनसब, नोकरी सारं काही सोडून फकीर बनेन. कायमचा परागंदा होईन.’’

त्यावर औरंगजेब कसानुसा हसला, त्या संदेशावरून त्याला आणखी एक कल्पना आली. आपले निजी रिश्तेदार सिवाजी ह्या नावानेच किती त्रस्त आणि परेशान होते!

बादशहाचा रात्रीचा नमाज आटोपला. तोवर दारात पुन्हा कहारांची गर्दी झाली. जहानारांची पालखी पुन्हा भेटीस आली होती. आपली दिवसभरातली महत्त्वाची कामं उरकून ती परतली होती. जेव्हा खासगीकडे ते दोघे बहीण-भाऊ तक्क्यांना टेकून बसले होते, तेव्हा जहानारा आपानी विषयाला हात घालण्यापूर्वीच खंतावल्या शब्दांत औरंगजेब बोलला, ‘‘खुदा की कसम, हा सिवाजी कधी सुधारणार नाही.’’

बादशहाने शिवरायांबद्दल आपल्या जळजळीत भाषेत मतप्रदर्शन केलं. तर जहानारांकडे बारीक नजर लावत तो बोलला, ‘‘क्यूँ आपाऽऽ सिवाबद्दलचा आपला गुस्सा अचानक नाहीसा तर झाला नाही?’’

‘‘हाँ औरंगजेब, सुरत की बात एक बार छोड दीजिये। लेकिन फिर भी मुझे कुछ कहना है।’’ आता मोठ्या बहिणीच्या अधिकाराने जहानारा बादशहाशी खासगीत खूप मोकळेपणाने बोलत होती, ‘‘सिवा तर आपल्या मुघल सल्तनतचा जाती दुश्मन आहे. त्याचा बाप शहाजीसुद्धा असाच बगावतखोर होता. त्यामुळे त्याचं बंड दबोचण्यासाठी आपल्या अब्बूंना... शहाजहानसाहेबांना ताजमहलचं बांधकाम निम्म्यावर सोडून दख्खनमध्ये जावं लागलं होतं. मैं मानती हूँ, सिवा जैसे दुश्मन को सही समयपे रोकना जरुरी हैं... फिर भी आज एक बात आपल्या नजरेस आणणं मला माझं फर्ज वाटतं.’’

‘‘कोणती बात?’’

‘‘औरंगजेबऽऽ मैंने तो कितनी बडी जिंदगी, कितना बडा जमाना देखा हैं।

आमचे महान अब्बू शहाजहानसाहेब, बचपनके दिनोंमें दादाजी जहांगीरसाहेब। एक औरत या नात्याने आजची हिंदुस्थानची राजनीती माझ्याइतकी अन्य कुणाला माहीत नसेल.''

''आपली धडाकेबाज कारकीर्द, आपण जामा मशिदीसारख्या आग्रा आणि दिल्लीमध्ये गेल्या वीस-पंचवीस वर्षांत बांधलेल्या सुंदर सार्वजनिक इमारती आणि बडे बगीचे हे सारं आपलं योगदान पुऱ्या मुघल सल्तनतीला चांगलं ठाऊक आहे आपा...'' औरंगजेब कृतज्ञतापूर्वक बोलला.

''मेरी निगाह में कभी कोई फर्क या तास्सुब नहीं रहा। कोई शिया रहें या सुन्नी, साधू हो या फकीर... हर एकसे मैं अदबसे और मोहोबत से मिलती रहती हूँ।''

''पण आत्ताच आपल्या तोंडी हा असा सिवाबाबत नरमाईचा सूर का दिसतोय?''

''चार दिवसांमागे विजापुराकडून काही मौलवी आणि ग्यानी मेहमान माझ्या भेटीस आले होते. त्यांच्याकडे मी सिवाचा विषय काढताच, त्या सर्वांची आँसूभरी आँखे मी स्वतः बघितलीत.''

''अं? आपा? ऐसी कौनसी बात थी?'' चमकून औरंगजेबाने विचारलं.

''ते मौलवी आणि मुसाफिर आत्ताही पलीकडच्या एका सराईमध्ये मेहमानखान्यात मुक्कामी आहेत. जरूरत महसूस हो, तो बुलाईये उन्हें।''

''पण असा कोणता बयान दिला त्यांनी?''

''जेव्हा सिवाने प्रतापगडावर अफजलखानाचा कत्ल केला होता, तिथे आदिलशाही फौजेच्या पुऱ्या तबाहीनंतर अफजलखानाचे यारदोस्त जमले होते. जल्दबाजीमध्ये त्याची लाश घेऊन चालले होते; पण शिवाजीच्या शिपायांनी गुस्सेमें आकर उन्हे लाश दफनानेसे रोक दिया। तब खुद सिवाजी आगे बढे। उन्होने अपने साथियोंको उनके एक तारीखी दास्तान 'रामायण'की एक बात याद दिलाई थी। 'जब कत्ल के बाद रावण का बदन शमशानमें जलाने की तैयारी हो रही थी, तब खुद श्रीराम वहाँ पहुँचे और सबको उन्होने समझाया... मौत के बाद दुश्मनी नहीं रहती। अपने वतन के वास्ते मर मिटनेवाला हर सिपाही अपने लष्कर के वास्ते शहीद माना जाता हैं।' असं म्हणून सिवा पुढे झाला. त्याने आपल्या किल्ल्याच्या पायथ्याला अफजलखानाची कब्र बांधायला जगह दिली. तेव्हा सिवाची ती दिलदारी बघून तिथे मौजूद असलेले फकीर मोठ्याने

उद्‌गारले, 'अल्ला, हमारी बची हुई उम्र इस भले आदमी को अता फरमा दे!' मी थोडी ज्यादा जानकारी घेण्याची कोशिश केली. त्यानुसार सिवाने अनेक नगरं लुटली. दंगाफसादही केला; पण कधी इस्लामसह दुसऱ्या धर्माच्या मस्जिद अगर पूजाघरांना आपल्या फौजींना धक्का लावू दिला नाही. फिरंगी रहे या इस्लामी, दूसरे धरम की माँ-बहने अपनी समझनेवाला वह बडे दिलवाला इन्सान है।''

''आपा, आप के दिलकी असल बात साफ-साफ क्यूँ नहीं बता देती?'' वैतागून औरंगजेबाने विचारलं.

''दख्खनके उन काँटोंसे भरे पहाडों मे अन्य कोणाच्या मदती बगैर इस बहादूर आदमीने अपनी एक मरगठ्ठोंकी नई बडी दुनिया आबाद कर ली, अगर ऐसा ताकदवर आणि हिंमतबाज मर्द उद्या आपल्या मुघलिया सलतनतचा वजीर अगर दख्खनचा सुभेदार बनला, तर आमच्या सल्तनतच्या ताज और तख़्तकी रौनक कई गुना बढ सकती हैं।''

''यह कैसे मुमकिन आहे आपा?'' थोरल्या बहिणीच्या त्या अचानक प्रस्तावाने औरंगजेब चमकला.

''कोशिश करायला काय हरकत आहे?''

''आपके ख्वाब तो बहोत रंगीन हैं आपा!''

''अगर ऐसा सूरमा... जाँबाज शक्स हमें मिल गया, तो तारीख का रुख, रियासत की छवी बदल जायेंगी। इसी वास्ते मैं अर्ज करती हूँ...उसे खत्म करनेकी जल्दबाजी न करें।''

''क्या?'' औरंगजेबाने धास्तावून विचारलं.

''इसको हमारे सल्तनतके कारवाँमें एक बडा अंमलदार या सरदार बनाकर जोड दीजिये। उसकी काबिलियतसे फायदा उठाईये। हमारे ताज की बुलंदी और भी बुलंद हो जायेगी!''

औरंगजेब जहानाराकडे बघत हसत बोलला, ''आप बहुत भोली हो, सिवाला बढावा देण्याचे तुमचे हे सोचविचार मला बिलकूल मंजूर नाहीत. मुमकिनही नही!'' औरंगजेब विषय संपवत म्हणाला.

''कोशिश करने में कौनसी दिक्कत है?'' जहानाराही हटून बसली होती.

♦

## १६ फेब्रुवारी २०२६ ते १५ मार्च २०२६ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१६ फेब्रुवारी - एकहार्ट टोले यांचा जन्मदिन**

'अवनी एक नवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - अविनाश लोंढे यांचा जन्मदिन**

'बेधुंद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - सदानंद कदम यांचा जन्मदिन**

'सांगाती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

---

**१८ फेब्रुवारी - तेहमिना दुर्रानी यांचा जन्मदिन**

'ब्लास्फेमी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**१८ फेब्रुवारी -लिसा सी यांचा जन्मदिन**

'शांघायच्या मुली', 'ड्रीम्स ऑफ जॉय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११२५/- । सवलत किंमत ८४५/-**

---

**१९ फेब्रुवारी - छ. शिवाजी महाराज जयंती**

'जाणता राजा श्री शिवछत्रपती', 'श्रीमान योगी', 'लक्ष्यवेध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?', 'शिवछत्रपती : एक मागोवा', 'महासम्राट-झंझावात, रणखैंदळ, अस्मानभरारी', 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८३५/- । सवलत किंमत २६८४/-**

---

**२० फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'शॅपेल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १३९/-**

**२० फेब्रुवारी - पीअर बाऊल यांचा जन्मदिन**
'द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १५४/-**

---

**२१ फेब्रुवारी - प्रा. डॉ. कैलास सार्वेकर यांचा जन्मदिन**
'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२४ फेब्रुवारी - डॉ. सुचित तांबोळी यांचा जन्मदिन**
'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४६०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२४ फेब्रुवारी - छ. राजाराम महाराज जयंती**
'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४५२/-**

---

**२४ फेब्रुवारी - गिलियन फ्लिन यांचा जन्मदिन**
'गॉन गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ५६२/-**

---

**२५ फेब्रुवारी - डॉ. आ. बा. पाटील यांचा जन्मदिन**
'बोन्साय', 'घरातील बाग', 'शेती करू फायद्याची', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११२०/- । सवलत किंमत ६७२/-**

---

**२५ फेब्रुवारी - डॉ. आशिष बोरकर यांचा जन्मदिन**
'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**२७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरवदिन**
रु. ३०००च्या खरेदीवर ४० टक्के सवलत (एका पुस्तकाची एक प्रत)

---

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**
**संच १**-'A to Z विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'छंदातून विज्ञान', 'साधी यंत्रे', 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमतीजमती', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'प्रेमाचा रेणू', 'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'संकरित',

‘डिंभक’, ‘देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर’, ‘पृथ्वीवर माणूस उपराच!’, ‘अज्ञाताचे विज्ञान’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६६५/- । सवलत किंमत १६७५/-**

**संच २-**‘तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-१’, ‘तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-२’, ‘असे घडले सहस्रक’, ‘प्रयोग वनस्पती विज्ञानाचे’, ‘अंतरिक्षाचा वेध’,‘विज्ञानातील सरस आणि सुरस’, ‘नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी’, ‘फक्त खेळण्यांसाठी’, ‘खेळणीच खेळणी’, ‘खेळणी विज्ञानाची’, ‘विज्ञान गमती’, ‘विज्ञान जमती’, ‘इ.स. २५९५’, ‘वाचनातून विज्ञान’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४२५/- । सवलत किंमत १४९९/-**

**संच ३ -**‘पर्यावरण प्रदूषण’, ‘वेध पर्यावरणाचा’, ‘ज्ञानदीप’, ‘ग्यानबाचं विज्ञान’, ‘सुगरणीचं विज्ञान’, ‘गुडबाय अर्थ’, ‘विज्ञान विशेष’, ‘भिंतींना जिभाही असतात’, ‘विज्ञान प्रपंच’, ‘वायुप्रदूषण’, ‘राफिणू’, ‘थर्ड मॅन’, ‘पाठलाग’, ‘दूरचे प्रवासी’, ‘झाडाचं गुपित’, ‘अवकाशातील दूत’

**संचाची मूळ किंमत ४३१०/- । सवलत किंमत २६८९/-**

**संच ४ -** ‘गार्डिअन’, ‘जॉर्ज अ‍ॅन्ड द बिग बँग’, ‘जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट’, ‘जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स’, ‘रोबॉट फिक्सिंग’, ‘स्वप्नचौर्य’, ‘असे शास्त्रज्ञ, असे संशोधन’, ‘आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान’, ‘आपल्या पूर्वजांचे विज्ञान’, ‘कथारूपी खगोलशास्त्र’, ‘शास्त्रज्ञांचे जग’, ‘अशक्य भौतिकी’, ‘नाते ब्रह्मांडाचे’, ‘भिंतींना जिभाही असतात’, ‘प्लँटोन’, ‘खुजाबा’, ‘जॉर्ज अ‍ॅन्ड द ब्ल्यू मून’, ‘जॉर्ज अ‍ॅन्ड द शिप ऑफ टाइम’, ‘जॉर्ज अ‍ॅन्ड द अनब्रेकेबल कोड’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत,

**संचाची मूळ किंमत ६६०५/- । सवलत किंमत ४१३१/-**

---

**२८ फेब्रुवारी - स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन**

‘क्रिटिकल मास’, ‘द अ‍ॅटर्नी’, ‘द सिमीऑन चेंबर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६४८/-**

## खालील संचांवर १ ते १५ मार्च दरम्यान खास सवलत

**१ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन**

'उधाण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत १०५/-**

---

**४ मार्च - प्रिया कुमार यांचा जन्मदिन**

'परवाना जगण्याचा', 'प्रतिरूप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २९८/-**

---

**४ मार्च - खालिद हुसैनी यांचा जन्मदिन**

'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स', 'अँड द माउंटन्स एकोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७५०/-**

---

**७ मार्च - पिअर्स पॉल रीड यांचा जन्मदिन**

'अलाइव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**७ मार्च - ई. एल. जेम्स यांचा जन्मदिन**

'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३४४/-**

---

**८ मार्च - रश्मी बन्सल यांचा जन्मदिन**

'अराइज, अवेक', 'स्वप्नांचे इंद्रधनू...', 'टेक मी होम', 'कनेक्ट द डॉट्स', 'आय हॅव अ ड्रीम', 'शाइन ब्राइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२९५/- । सवलत किंमत १७४४/-**

---

**८ मार्च - महिलादिन**

'रुपेरी सिंधू', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'कर्मयोगिनी', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग २', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल : भाग ३', 'नोबेल ललना - भाग १' , 'नोबेल ललना - भाग २', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स',

‘ॲज आय सी... भारतीय पोलीस सेवा...’, ‘ॲज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन...’, ‘ॲज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...’, ‘Be the Change... भ्रष्टाचाराशी लढा’, ‘आय डेअर’, ‘इट्स ऑलवेज पॉसिबल’, ‘मजल... दरमजल...’, ‘व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय’, ‘दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल’, ‘जाणती राणी महाराणी ताराबाई’, ‘कृष्णसखी राजराणी मीराबाई’, ‘ममतेची मूर्ती मदर तेरेसा’, ‘रणरागिणी दुर्गाराणी’, ‘सती साध्वी देवी अहिल्या’, ‘बंधमुक्त होताना...’, ‘ब्रह्मकन्या’, ‘माय डॉटर माय मदर’, ‘नेतृत्वनिर्मिती’, ‘निर्भय प्रशासन’, ‘करवीर छ. इंदुमती राणीसाहेब’, ‘ज्ञानाई सावित्रीबाई फुले’, ‘महाराणी बायजाबाई शिंदे दख्खनची सौंदर्य लतिका’, ‘शिवपत्नी महाराणी सईबाई’, ‘महाराणी येसूबाई’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८४३५/- । सवलत किंमत ५४८३/-**

---

**१२ मार्च - यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन**

‘वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध’, ‘पहिली फेरी?’, ‘साहेब संध्याकाळी भेटले..’, ‘यशवंतराव चव्हाण आठवणी-आख्यायिका’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०५५/- । सवलत किंमत ७३९/-**

---

**१४ मार्च - शेवडे गुरुजी यांचा जन्मदिन**

शेवडे गुरुजी लिखित २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २९३०/- । सवलत किंमत २१०९/-**

♦


**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**
website : www.mehtapublishinghouse.com
**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**
author@mehtapublishinghouse.com



# प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार २०२५




अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे
९९वे
सातारा
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०२६

RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/02/2026 Posting Date : 11/02/2026
































**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________